रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १५
www.ramprahar.com
गुरुवार, १ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## वादग्रस्त प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द



**नवी दिल्ली :** वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) मोठा दणका मिळाला आहे. यूपीएससीने पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर पूजा खेडकर यांना भविष्यात सर्व परीक्षा देण्यास मनाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र कॅडरच्या प्रशिक्षणार्थी आएएस अधिकारी पूजा खेडकर या गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. चुकीची माहिती आणि प्रमाणपत्रांच्या आधारावर केंद्रीय लोकसेवा आयोगाची फसवणूक करून त्यांनी परीक्षा पास केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. यासंदर्भात आयोगाने त्यांच्याविरूद्ध गुन्हादेखील दाखल केला होता. यूपीएससीने पूजा खेडकर यांच्या २००९ ते २०२३ या काळातील सर्व रेकॉर्ड तपासल्यानंतर ही कारवाई केली आहे.

### अंतरंग
राज्यात एक कोटी ६३ लाख ६० हजार पीकविमा अर्ज/२
पनवेलमध्ये रंगणार दोन दिवसीय नाट्य महोत्सव/३
ऑलिम्पिकमध्ये भारताच्या खेळाडूंची कमाल/८

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे

## कृती समितीची मागणी; केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ सकारात्मक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' नाव देण्यासाठी आपण आग्रही राहावे, अशी मागणी लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे नवी दिल्ली येथे बुधवारी (दि.३१) करण्यात आली.**



या वेळी कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी खासदार संजीव नाईक तसेच कृती समितीचे कार्यकारिणी सदस्य आमदार महेश बालदी आणि दि.बा.पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील उपस्थित होते. या सर्वांनी कृती समिताचे एक निवेदन केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांना दिले.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या वेळी सकारात्मक प्रतिसाद दिला. यासंदर्भात आपण निश्‍चितच पुढाकार घेऊ, तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत थोड्याच दिवसांत माझ्या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्याशी नक्कीच सकारात्मक चर्चा करू, असेही केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी ठोस आश्‍वासन दिले. सर्वपक्षीय कृती समितीने यापूर्वी तत्कालीन नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या नवी दिल्लीतील कार्यालयात आणि नवी मुंबईतील साईट कार्यालयात भेट घेतली असता, त्यांनीही नामकरणासाठी पूर्ण पाठिंबा आणि मदतीची ग्वाही दिली होती, याचा उल्लेखही या निवेदनात केला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ, असावे यासाठी जून २०२१मध्ये ठाणे, रायगड, पालघर आणि मुंबई जिल्ह्यात एक भव्य आंदोलन झाले. लोकनेते दि. बा. पाटील हे पेशाने वकील होते. ते स्थानिक रहिवाशांसाठी केवळ आदर्शच नव्हते तर त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण योगदानही दिले आहे. शेतकर्‍यांसाठी कायदे प्रस्थापित करणे, जमिनीचे हक्क, भूजल नियमन कायदा यांसारखे कायदे आणणे आणि विविध कायदेशीर सुधारणांद्वारे शेतकर्‍यांचे अधिकार वाढविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संयुक्त महाराष्ट्राच्या (संयुक्त महाराष्ट्र चळवळ) चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता आणि राष्ट्रीय स्तरावरील ओबीसी चळवळीत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

जमीन विरूद्ध जमीन कायदा हा त्यांच्या संघर्षाचा परिणाम होता. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील स्थानिक लोकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. **(पान २ वर..)**

### यशश्री शिंदे हत्या प्रकरण

# आरोपी दाऊद शेखला सात दिवसांची पोलीस कोठडी

**पनवेल, उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण येथील युवतीच्या हत्येप्रकरणी दाऊद शेख याला कर्नाटकमधून अटक केली आहे. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याचे अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे दीपक साकोरे यांनी सांगितले. दरम्यान, बुधवारी (दि.३१) सकाळी पनवेल सेशन कोर्टाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



युवतीच्या पालकांनी २५ जुलै रोजी उरण पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविली होती. पोलिसांना उरण रेल्वेस्थानक परिसरात तिचा मृतदेह आढळून आला. तपासात दाऊद शेख नावाच्या युवकाचा व तिचा दूरध्वनी झाल्याचे समोर आले. दाऊद हा उरणमध्ये आढळला नाही. तो कर्नाटक येथील मूळ गावी गेल्याची शक्यता वर्तवली होती.

उरण पोलिसांनी कर्नाटक राज्यातील गुलबर्गा तालुक्यातील शहापूर हिल येऊन मंगळवारी (दि.३०) पहाटे ५ वा.चे सुमारास ताब्यात घेऊन तत्काळ नवी मुंबईला आणून अटक केली. त्याच्याविरोधात अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **(पान २ वर..)**

## एकतर्फी प्रेमातून भर रस्त्यात तरुणीवर वार; आरोपी ताब्यात

**अमरावती :** अमरावतीमध्ये एकतर्फी प्रेमातून एका तरुणाने तरुणीवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

२४ वर्षीय आरोपी तरुण प्रफुल्ल काळकरने तरुणीचा पाठलाग केला आणि चाकूने तिच्यावर हल्ला केला. तिने आरडाओरडा केल्यामुळे त्या ठिकाणी असलेले रिक्षाचालक मदतीसाठी धावून आहे. पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या प्रफुल्लला रिक्षाचालकांनी पकडले आणि चांगला चोप दिला. त्यानंतर त्यांनी आरोपीला अमरावती शहरातील राजपेठ पोलिसांच्या ताब्यात दिले.

## ...तर त्याला जशास तसे उत्तर द्या –आमदार नितेश राणे



**उरण : रामप्रहर वृत्त**

आपल्या आया, बहिणींकडे कोणी वाकडी नजर करून बघत असेल, तर त्याला जशास तसे उत्तर द्या आणि अशी घटना पुन्हा घडू नये, म्हणून जागृत रहा, असे आवाहन आमदार नितेश राणे यांनी केले. **(पान २ वर..)**

### निवडक

#### नाशिक, नगर, अमरावतीत नवीन एमआयडीसीचा प्रस्ताव

**पुणे :** गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज, अहिल्यानगर जिल्ह्यातील लिंगदेव, अकोले, नाशिक जिल्ह्यातील कळवण-सुरगाणा, जांबुटके तसेच अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे एमआयडीसी उभारण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत, तसेच राज्यात यापुढे नवीन एमआयडीसी उभारण्यासाठी किमान १०० एकर जमिनीची उपलब्धता करून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी दिले.

#### पहिलीच्या विद्यार्थ्याकडून तिसरीच्या मुलावर गोळीबार

**पटना :** बिहारच्या सुपौल जिल्ह्यातील त्रिवेणीगंजमध्ये लालपट्टी भागातील एका खासगी शाळेत पहिलीच्या विद्यार्थ्याने तिसरीत शिकणार्‍या १० वर्षीय विद्यार्थ्यावर गोळ्या झाडल्या आहेत. विद्यार्थ्याच्या हाताला गोळी लागली आहे. धक्कादायक म्हणजे पिस्तूल बॅगेत घेऊन मुलगा शाळेत आला होता. जखमी मुलाला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

## पनवेलमध्ये मोफत जयपूर फूट शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.४)आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिराच्या अनुषंगाने मोफत जयपूर फूट शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात आरोग्य तपासणी आणि औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. अपंगत्व आलेले किंवा अपघातात हात व पाय गमावल्यामुळे जीवनाचा प्रवास खडतर होत असतो. यावर योग्य उपाय म्हणून तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम अवयवची निर्मिती झाली. या कृत्रिम हात, पाय अर्थात जयपूर फूटमुळे दिव्यांगांचे आयुष्य बदलून गेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून साधू वासवानी मिशन पुणे यांच्या सोबतीने जयपूर फूट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचा लाभ घेण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी डॉ. अरुणकुमार भगत (९२२३५०५५५५) किंवा अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केले आहे.




## अलिबाग समुद्रकिनार्‍यावर स्वच्छतेसाठी मशिन्स उपलब्ध

### आमदार महेंद्र दळवी यांच्याकडून हस्तांतरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील समुद्रकिनार्‍यांची स्वच्छता यांत्रिकी पद्धतीने करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून जर्मन बनावटीच्या तीन अत्याधुनिक बीच क्लिनींग मशिन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मशिनचे संबंधित ग्रामपंचायतींना हस्तांतरण आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३१) करण्यात आले.



समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात कचरा पडल्याचे नेहमी दिसून येते. शासकीय कार्यालये, सामाजिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम राबवून किनारे स्वच्छ करण्यात येतात, मात्र हे प्रयत्न अपुरे पडत आहेत. त्यामुळे या मशिनचा वापर करण्यात येणार आहे. या वेळी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र झेळके, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, पंचायत समिती गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, सरपंच, अधिकारी उपस्थित होते.

#### या समुद्रकिनार्‍यांची होणार स्वच्छता

**पहिली मशिन :** आक्षी, नागाव, रेवदंडा.
**दुसरी मशिन :** वरसोली, थळ, नैवेद्य नवगाव.
**तिसरी मशिन :** किहीम, आवास आणि सासवणे

# राज्यात एक कोटी ६३ लाख ६० हजार पीकविमा अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत एक रुपयात पीक विमा ही संकल्पना राबविणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. खरीप २०२४ हंगामात ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत एक कोटी ६३ लाख ६० हजारांपेक्षा अधिक पीकविमा अर्ज दाखल करण्यात आले आहेत. राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी पीक विम्यासह विविध योजनांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. गेल्या २४ तासात राज्यभरातून तब्बल पाच लाख ७४ हजार शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना ७.५ हॉर्स पॉवर पर्यंतच्या कृषी वीज पंपांना पूर्णपणे मोफत वीज देण्याचा निर्णय झाला. त्यानंतर याबाबतचा शासन निर्णय राज्य सरकारने निर्गमित करून 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजने'स आवश्यक निधी उपलब्ध करून दिला. याचा लाभ राज्यातील सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून यासाठी सुमारे १४ हजार ७६० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी कापूस व सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजारांचे अनुदान देण्याची घोषणा केली होती. सुमारे ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून याचा लाभ राज्यातील सुमारे ८३ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. यात सुमारे ५३ लाख ८३ हजार सोयाबीन उत्पादक (एकूण लाभ – २६१२.४८ कोटी) तर सुमारे २९ लाख ९० हजार कापूस उत्पादक शेतकरी (एकूण लाभ – १५४१ कोटी) शेतकऱ्यांना लाभाचे वितरण डीबीटीद्वारे थेट संलग्न बँक खात्यांवर करण्यात येणार आहे.

खरीप २०२३ मध्ये एक रुपयात पीकविमा ही योजना प्रथमच अंमलात आली होती. त्यानंतर खरिपात राज्यात बहुतांश भागात दुष्काळसदृश परिस्थिती आणि हवामानातील असमतोल यामुळे झालेल्या नुकसानीच्या पोटी विमा धारक शेतकऱ्यांना आतापर्यंत अग्रीम, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात व पीक कापणी प्रयोगानंतर असे मिळून आतापर्यंत एकूण ७,२८० कोटी रुपये इतका पीकविमा मंजूर करण्यात आला असून यांपैकी ४,२७१ कोटी रुपयांची वितरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर ३,००९ कोटी रुपये विमा रक्कम वितरण सुरू आहे. तसेच पीक कापणीचे अंतिम अहवाल निश्चितीनुसार या रक्कमेत आणखी वाढ होणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून देशात सर्वाधिक पीकविमा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळाला आहे. तसेच योजना सुरू झाल्यापासून ही रक्कम आजवरची सर्वाधिक पीकविमा रक्कम असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

### प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत महाराष्ट्र देशात अव्वल

महाराष्ट्र राज्य हे देशात डाळींच्या उत्पादनात अग्रेसर असून आता प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेतही महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. या योजनेद्वारे प्रकल्प किमतींच्या ३५% किंवा १० लाख रुपये बँक कर्जाशी निगडित या प्रकारे गुंतवणूक व अनुदान योजना राबविली जात असून या योजनेतून मागील एक वर्षात तब्बल १७१० कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे.आगामी काळात जलयुक्त शिवार २.०, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २, कृषी क्षेत्रात पेरणी पूर्वी मातीचे परीक्षण ते अगदी सूर्यकिरणांचा योग्य वापर यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्वतोपरी वापर करण्याच्या दृष्टीने आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा शेतीसाठी उपयोग करण्यासाठी विशेष संशोधन या तीन महत्वाकांक्षी योजनांच्या माध्यमातून आणखी कामे शेतीच्या उन्नतीसाठी हाती घेण्याचे नियोजन कृषी विभाग करत आहे.

# कोचिंग सेंटर्सचे सेफ्टी ऑडिट होणार –मुख्यमंत्री

**नवी मुंबई : बातमीदार**



दिल्ली कोचिंग सेंटरच्या दुर्घटनेच्या पुनरावृत्तीबद्दल कार्यकर्त्यांच्या चिंतेवर त्वरित प्रतिक्रिया व्यक्त करताना, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाला राज्यातील सर्व शहरांमधील सर्व शिकवणी वर्ग आस्थापनांचे सेफ्टी ऑडिट तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रीय राजधानीतील एका इमारतीच्या तळघरातील पुरात किमान तीन विद्यार्थी बुडाले असून कोचिंग सेंटरच्या कामकाजावर सर्वत्र चिंता निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ऑनलाईन फोरम अलर्ट सिटिझन्स टीमकडून ईमेल प्राप्त केल्यानंतर दोन तासांच्या आत कारवाई केली.

दिल्ली शोकांतिका ही डोळे उघडणारी आहे, असे –उढ निमंत्रक आणि सामाजिक कार्यकर्ते बी एन कुमार म्हणाले आणि राज्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी सरकारने पावले उचलण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्र्यांनी सामाजिक संस्थेकडून नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांना दिलेला ईमेल चिन्हांकित केला आणि त्यांना सूचना पुढे नेण्यास आणि कृती करण्यास सांगितले. कुमार यांनी सांगितले की, हे स्वयंचलितपणे व्युत्पन्न झालेला मेल नाही कारण ईमेल विशेषतः गुप्ता यांना चिन्हांकीत केला होता.

या मुद्द्यावर माहिती अधिकार कायद्याद्वारे सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. खरं तर, त्यांनी मुंबई आणि नवी मुंबईच्या महापालिका आयुक्तांना आधीच सावध केले आहे. पार्किंग, तळघर आणि अगदी अतिक्रमित बाल्कनीमध्ये कोचिंग क्लासेस चालवले जात आहेत आणि संबंधित नागरी अधिकारी अनधिकृत जागेतून कोट्यवधींच्या व्यवसायाबद्दल बेफिकीर असल्याचे दिसून येते, असे ACT ने मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये म्हटले आहे.

आम्ही अंधारात डार्ट टाकत नाही आणि आम्ही जे प्रश्न उपस्थित करतो ते अतिक्रमणाच्या पलीकडे आहेत, ते म्हणाले. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी नवी मुंबईतील कोपर खैरणे येथील गल्लीबोळात कोचिंग सेंटर असलेल्या इमारतीला आग लागली होती. दुसऱ्या एका इमारतीत त्याच नोडमधील एका स्टिल्ट भागातून एक केंद्र सुरू असून रस्त्यावर वाहने उभी केली जात आहेत.

नागरी अधिकाऱ्यांकडे आवाज उठवणारे कार्यकर्ते मधु शंकर यांनी सांगितले की, दोन मुलींची आई या नात्याने तिची चिंता ही आहे की पालकांनी त्यांच्या मुलांना होणाऱ्या संभाव्य धोक्यांपासून सावध राहावे. जोखीम आग, चेंगराचेंगरी आणि इमारत क्रॅश असू शकतात, तिने निदर्शनास आणले.

# अष्टमी पुलावरून कुंडलिका नदीत एकाची उडी; शोध सुरू

**रोहे : प्रतिनिधी**



रोहा अष्टमी पुलावरून सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास कुंडलिका नदीच्या पात्रात उडी मारल्याची घटना घडली आहे. घटनेची माहीत मिळताच रोहा पोलिस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची टिम तपासात लागली आहे.

आपत्कालीन टिम, स्वता पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, सोबत एकस अधिकाऱ्यासह सात पोलिसांची टिम कुंडलिका नदीच्या किनारी असलेल्या तालुक्यातील कुंभोशी, गोफण, न्हावे, सानेगाव, आदी ठिकाणी कुंडलिका नदीच्या पात्रात तपास करीत आहेत.

कुंडलिकानदी दुथडी भरून वाहत आहे. अशा परीस्थिती तपास त्या व्यक्तीचा सुरू आहे. नेमके कुणी उडी मारली, कशामुळे उडी मारली. या बद्दल कोणताही ठोस माहीती कोणाकडे ही नाही.तपास मात्र वेगात सुरू आहे.

# आजपासून मासेमारी सुरू

## काही बोटी नारळी पौर्णिमा झाल्यावर समुद्रात उतरणार

**मुरूड : प्रतिनिधी**

१ जून ते ३१ जुलैपर्यंत मासेमारी बंद असते. आता हा कालावधी संपला असून १ ऑगस्टपासून अधिकृत मासेमारी सुरू होणार आहे. सध्या समुद्रात जोरदार वारे वाहत आहेत त्यामुळे असंख्य मच्छिमार नारळी पौर्णिमा झाल्यावर मासेमारीस जाणार आहेत. तर काही बोटी १ ऑगस्ट रोजी समुद्रात उतरणार आहेत.

यंदा पाऊस उशिरा सुरू झाला. जुलै मोहिनीचे शेवटचा आढवाड्यात पाऊस नसतो. वारा वादळ कमी होते, परंतु ह्यावर्षी २७ जुलै आले तरी पाऊस वारा थांबत नाही म्हणून कोळी बांधव चिंतेत आहे. सध्या संततधार पाऊस थांबला असून श्रावण महिन्याच्या सरींप्रमाणे एखादी सर येत आहे.

जून ते ३१ जुलैपर्यंत सुमारे २१८७ मिलीमीटर एवढा पाऊस मुरूड तालुक्यात पडला आहे. अनेक मच्छिमार आपल्या होडीवर विधिवत पूजा करून आपल्या होड्या समुद्रात सोडणार आहेत. सध्या मच्छिमारांची पूर्वतयारी सुरू झाली असून जाळी भरणे, खलाशांची जमवाजमव, डिझेल, बर्फ, अन्न धान्य भरून तयारी काही मच्छीमारांनी चालविली आहे.

समुद्र किनारी जाळी विणणे, होड्यांना तेल पाणी, डागडुजी, रंग लावणे, बोर्ड रंगवणे आदी कामे अंतिम टप्प्यात आलेली आहेत. मुरुड तालुक्यात राजपुरी, एकदरा, मुरूड, मजगाव, दांडा, काशिद, बोर्ली, कोर्लइ, साळाव व चोरढे मिळुन ७५० हून अधिक मासेमारी नौका आहेत.

शासन आदेशाप्रमाणे दोन महिने पूर्णपणे मच्छिमारी बंद ठेवली गेली आहे. मागील चार वर्षां पासुन समुद्रातील हवामान बिघडल्याने तुफान, वादळाचा सामना करतांना मत्स्यव्यवसाय आर्थिक नुकसानीत आहे. परिणामी या व्यवसायातील लोकांना खुपच संघर्ष करावा लागल्याचे चित्र आहे.

मत्स्य प्रजनन काळात खोल समुद्रातील मासेमारी बंद असल्याने किनाऱ्यालगत जवळा, कोळंबी, बोईटे आदी बारीक मासळी वर उपजिविका होत नसली तरी थोडा फार हात लागत आहे. १ ऑगस्टपासून होणारी मासेमारी यशस्वी होणे खूप आवश्यक आहे.

यासाठी मच्छिमार देवाचा धावा करीत असून यंदाची मासेमारीचा हंगाम सुजलाम सुफलाम जावा, अशी पार्थना सर्वच मच्छिमार करताना दिसत आहेत. समुद्र किनारी काढलेल्या होड्या आता समुद्रात लोटण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

# मॅझेनाईन फ्लोअरचे लोकार्पण



**नवी मुंबई :** आमदार मंदा म्हात्रे यांचा बेलापूर मतदार संघामध्ये विविध प्रकारच्या विकास कामांचे भूमिपूजन व उद्घाटन समारंभ कार्यक्रमांनी वेग घेतला आहे. नुकतेच वाशी येथील मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ संचलित प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालयच्या मॅझेनाईन फ्लोअरकरिता आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास निधीमधून पाच लाख रुपये खर्च करण्यात आला. त्या मॅझेनाईन फ्लोअरचे लोकार्पण झाले.

या वेळी प्रा. अश्विनी बाचालकर, रवींद्र नेने, मधुकर राऊळ, प्रवीणकुमार पडवळकर, माधव ठाकूर आदी उपस्थित होते.

# भरधाव वाहनाची झाडाला धडक; एक ठार, दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल जवळील जुना पुणे–मुंबई महामार्गावर मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर ठोंबरेवाडी गावाजवळ बुधवारी (दि. ३१) सकाळी भरधाव मारुती सुझुकी सेलेरिओ गाडीवरील चालकाचा ताबा सुटल्याने त्याने रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर जावून गाडी आदळल्याने झालेल्या अपघातात गाडीचालकाचा गंभीररित्या जखमी होवून मृत्यू झाला आहे. तर गाडीतील दोघे जखमी झाले आहेत.

गाडीचालक विजय पवार (वय ४९, रा. कराड) हे त्यांच्या ताब्यातील मारुती सुझुकी सेलेरिओ गाडी (एमएच–४६–बीएफ–९५७८) ही गाडी घेवून लोणावळा ते पनवेल असा प्रवास करीत असताना शेडुंग टोल नाका ठोंबरेवाडी येथे त्यांच्या गाडीवरील त्यांचा ताबा सुटून रस्त्यावर असलेल्या झाडावर जावून गाडी आदळल्याने झालेल्या अपघातात ते स्वतः गंभीररित्या जखमी होवून मयत झाले आहेत.

गाडीतील प्रवासी भिकाजी गायकवाड (वय ५८) व संगीता गायकवाड (वय ५४) हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

कुशल व रोजगारक्षम महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' जाहीर केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या योजनेव्दारे राज्यातील युवकांना उद्योगांमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाव्दारे (इंटर्नशिप) रोजगारक्षम करून उद्योगांकरिता कुशल मनुष्यबळ मिळणार आहे. याकरिता ५५०० कोटी इतक्या निधाची तरतूद करण्यात आलेली आहे.

या योजनेचा लाभ १८ ते ३५ वयोगटातील युवक घेऊ शकणार असून सहा महिने कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी असणार आहे. उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत विद्यावेतन मिळणार असून बारावी उत्तीर्णांना सहा हजार रुपये, आय.टी.आय व पदविका उत्तीर्णांना आठ हजार रुपये तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांना १० हजार रुपये दरमहा विद्यावेतन मिळणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक आर्थिक वर्षात १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) संधी उपलब्ध होणार असून शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक व ग्रामपंचायतीसाठी एक असे एकूण ५० हजार योजनादूत नेमण्यात येत आहेत.

याकरिता शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व विविध क्षेत्रातील प्रकल्प, उद्योग, स्टार्टअप, आस्थापनांनी आवश्यक मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदविणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे इच्छुक उमेदवारांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

याविषयीच्या अधिक माहितीसाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) येथील जुने कोषागार कार्यालयाठिकाणी असलेल्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांचेशी संपर्क साधता येईल. त्या कार्यालयाचा संपर्क दूरध्वनी क्रमांक ०२२–२५४२८३०० हा आहे.

**पान १ वरुन**

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे

पाच वेळा (जवळपास २५ वर्षे) आमदार म्हणून काम केले आणि दोन वेळा खासदारही होते. ते महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेतेही होते. त्यांचे संपूर्ण राजकारण हे जनसेवेला समर्पित होते. विमानतळाला त्यांचे नाव देणे हा या दिग्गज व्यक्तीचा खरा सन्मान ठरेल आणि विमानतळ आणि नवी मुंबईचाच नव्हे तर राज्याचा आणि देशाचा दर्जा उंचावेल.

लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने ठाणे, रायगड, पालघर आणि मुंबई जिल्ह्यांतील हजारो नागरिकांचा सहभाग घेऊन मानवी साखळी, मशाल रॅली, सिडको येथे निदर्शने आणि काम बंद यांसारखी विविध आंदोलने आणि आंदोलने केली आहेत. या नामकरणाच्या समर्थनार्थ सरपंच, पंचायत समित्या, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, आमदार, खासदार यांनी हजारो ठराव आणि पत्रे सरकारला पाठवली आहेत. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विधानसभेत या नामकरणासाठी ठराव मंजूर केला आणि तो ठराव नवी दिल्लीतील नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे पाठवला आहे. या ठरावाच्या पाठपुराव्यासाठी हे निवेदन आम्ही आपणास सादर करीत आहोत, असे कृती समितीच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना सांगितले.

त्या आंदोलनात सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील आणि विशेषत: चार जिल्ह्यांतील जनतेच्या वतीने आम्ही सर्वपक्षीय समिती विनंती करतो की, कृपया यासाठीची प्रक्रिया लवकरात लवकर करून नवी मुंबई विमानतळाचे नाव लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ करावे, असेही अखेरीस निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### आरोपी दाऊद शेखला सात दिवसांची पोलीस कोठडी

याबाबत पोलीस अधिकारी साकोरे यांनी सांगितले की, दाऊद आणि ही युवती यांची ओळख होती. ते एकाच शाळेत होते. दाऊद कोरोना काळात कर्नाटकमध्ये गेल्याने त्यांचा संपर्क तुटला होता. सध्या तरी यात तो एकच आरोपी असून गुन्ह्यात त्याला कोणी मदत केली का, याशिवाय हत्येचे नेमके कारण काय आहे, आदी प्रकरणी तपास सुरू आहे, असे साकोरे यांनी सांगितले. ही युवती अल्पवयीन असताना दाऊदविरोधात तिच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल केला होता.

### ...तर त्याला जशास तसे उत्तर द्या -आमदार नितेश राणे

आमदार नितेश राणे यांनी मंगळवारी (दि.३०) शिंदे कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, तसेच यशश्रीला श्रद्धांजली वाहिली. उरणमधील यशश्री शिंदे या तरुणीची हत्या करून तिच्या मृतदेहाची विटंबना करण्यात आली होती. पोस्टमार्टममध्ये तिच्या शरीरावर वार करून तिची क्रूरपणे हत्या केल्याची बाब समोर आली आहे. या निंदनीय कृत्याचे राज्यभरात उमटले आहे. आमदार नितेश राणे यांनी मंगळवारी रात्री उशिरा शिंदे कुटुंबियांची उरणमध्ये भेट घेतली, तसेच पोलिसांशीही संवाद साधला.

# मोरे महिला महाविद्यालयात कार्यशाळा



**रोहे : प्रतिनिधी**

एम बी मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयातील 'संशोधन समिती' (रिसर्च सेल) मार्फत 'सीड बॉल मेकिंग' ची कार्यशाळा मंगळवारी (दि.३०) आयोजित करण्यात आली होती. रश्मी नरेंद्र जोशी, पर्यावरण तज्ञ, मुंबई यांनी कार्यशाळेत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत रश्मी जोशी यांनी पर्यावरणातील वृक्षसंपदेचे महत्व आणि त्याचे संवर्धन करण्यासाठी सीड–बॉल ही नावीन्यपूर्ण संकल्पना उपस्थितांना सांगितली. स्थानिक वनस्पतींच्या बिया, माती, शेणखत याचा वापर करून सौ. जोशी यांनी मजेशीर पद्धतीने विद्यार्थ्यांच्या मदतीने सीड–बॉल बनविले.

या कार्यशाळेत महिला महाविद्यालयातील प्राध्यापिका, विद्यार्थीनी, तालुक्यातील इतर महाविद्यालयातील, शाळांमधील विद्यार्थी आणि काही निसर्गप्रेमी यांनीही सहभाग घेतला.सर्व उपस्थितांना सहभाग प्रमाणपत्र व सीड बॉल देण्यात आले.

कार्यशाळेचे आयोजन प्रा. प्रतिमा भोईर, रिसर्च सेल प्रमुख आणि त्यांच्या सहकारी प्रा. शिल्पा खाडे यांनी केले.

# कर्जतच्या अग्निशमक दलाच्या ताफ्यात 'फायर बुलेट'

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत अग्निशमन दलाची कार्यक्शन क्षमता वाढविण्यासाठी फायर बुलेटचा समावेश करण्यात आला असून या फायर बुलेटमुळे काही आग लागण्याची घटना घडल्यास लवकरात लवकर आग विझविण्याचे काम सुरु होईल.

कर्जत नगर परिषदेमध्ये दहा बारा वर्षांपूर्वी अग्निशमन दलाची सुविधा ९ मार्च २०१३ रोजी सुनील तटकरे पालकमंत्री असताना आणि सुरेश लाड आमदार असताना सरू झाली. त्यावेळी नगराध्यक्ष सुनंदा कांगणे होत्या. या सुविधेत फायर बुलेटची भर पडली. अजूनही कर्जतमध्ये काही इमारतीपर्यंत अग्नी शमन दलाची गाडी पोहचू शकत नाही. हे लक्षात घेऊन आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रयत्न करून राज्य शासनाकडून फायर बुलेट मंजूर करून घेतली. त्यामुळे आता कर्जत नगर परिषदेच्या अग्नी शमन ताफ्यात आलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या फायर बुलेटचा सहभाग झाला आहे. अग्निशमन दलाची जबाबदारी प्रदीप हिरे, मारुती रोकडे, दिनेश हिरे हे जवान ही जबाबदारी सांभाळत आहेत.

# फसवणुकीच्या घटनांमध्ये होतेय वाढ

## हातचलाखीने एटीएम कार्ड बदलून पैसे काढले

### एक लाख ३१ हजारांना गंडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हात चलाखीने एटीएम कार्ड बदलून त्या ऐवजी दुसरे कार्ड दिले आणि एटीएम कार्ड स्वतःजवळ ठेवून एक लाख ३१ हजार ७२२ रुपये काढून फसवणूक केली. या प्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कमल सोनवणे (वय ६५) या सेक्टर आठ, खांदा कॉलनी येथे राहतात. त्या खांदा कॉलनी येथील पंजाब नॅशनल बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या. या वेळी एक व्यक्ती आत मध्ये जात होता म्हणून त्यादेखील आत गेल्या व पैसे काढून दे असे त्याला बोलल्या. एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकून पिन नंबर टाकला. त्यानंतर त्याने मशीनमध्ये काहीतरी बटन दाबले व एटीएम कार्ड बाहेर काढले. परत एटीएम कार्ड आतमध्ये टाकून पिन नंबर विचारला, या वेळी पिन नंबर सांगितला असता त्याने दहा हजार रुपये काढून सोनवणे यांच्या हातात दिले. पुन्हा दहा हजार रुपये काढण्यास सांगितले असता पैसे निघत नाही तुम्ही उद्या पैसे काढा असे बोलून एटीएम कार्ड हातात दिले व तो मोटरसायकलवर निघून गेला. सोनवणे घरी आल्यावर दुसऱ्या दिवशी त्यांना एटीएम मध्ये जाऊन पैसे काढण्याचा प्रयत्न केला मात्र पैसे निघत नव्हते.

या वेळी त्यांनी शिवानी यांना एटीएम कार्ड का चालत नाही हे पाहण्यासाठी सांगितले असता त्यावरील नाव वाचून हे तुमचे कार्ड नसल्याचे सांगितले. ताबडतोब त्यांनी बँक ऑफ इंडियाच्या शाखेत जाऊन माहिती घेतली असता एटीएम कार्ड वरून पैसे काढले असल्याचे त्यांना समजले. त्यांनी ते कार्ड ब्लॉक करावयास लावले. अनोळखी व्यक्तीने हातचलाखीने बंद एटीएम कार्ड सोनवणे यांना दिले आणि त्यांचे कार्ड स्वतःजवळ ठेवून त्याने २३ जुलै ते २५ जुलै पर्यंत एक लाख ३१ हजार ७२२ रुपये काढून फसवणूक केली.

## बोलण्यामध्ये गुंतवून मंगळसूत्र पळवले

पनवेल : रामप्रहर वृत्त

दुकानात कापूर घेण्याच्या बहाण्याने आलेल्या अनोळखी इसमाने बोलण्यात गुंतवून ५८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र घेऊन तो पसार झाला आह. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात बीएनएस कलम ३१८ (४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रतीक्षा प्रकाश शेट्ये या टपाल नाका पनवेल येथे राहत असून २७ जुलै रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास समर्थ कृपा, पूजा भंडार दुकान माळेवाडी, सुकापुर येथे असताना एक ४५ ते ५० वर्षीय अनोळखी ईसम आला आणि दुकानात कापूर घेण्याच्या बहाण्याने त्यांना अधिकचे पैसे दिले आणि मंदिरात दान करण्याची बातचीत करून त्यांना बोलण्यामध्ये गुंतवले. यावेळी शेटये यांनी मंगळसूत्र काढले. दरम्यान अनोळखी इसमाने त्याच्याकडील प्लास्टिकच्या पिशवीत मंगळसूत्र ठेवल्याचा बहाणा करून ते मंगळसूत्र घेऊन तो पसार झाला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच प्रतीक्षा शेट्ये यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## सोन्याच्या बांगड्या लंपास

पनवेल : वार्ताहर

सोन्याच्या बांगड्या पिशवीत ठेवतो सांगून फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रगती समीर मेकडे महात्मा फुले रोड, पनवेल येथे राहत असून त्यांचे महालक्ष्मी स्टेशनरी अँड जनरल स्टोअर नावाचे स्टेशनरीचे दुकान धुतपापेश्वर कंपनीजवळ आहे. त्यांच्या दुकानात ५० ते ५५ वर्षाचा अनोळखी व्यक्ती आला आणि मंदिरात पैसे दान करा असे सांगितले. या वेळी त्याला पैसे देण्यात आले व त्यावर काही जड वस्तू ठेवा असे सांगून प्रगती मेकडे यांच्या हातातील चार सोन्याच्या बांगड्या त्यावर काढून ठेवण्यास सांगितल्या व त्यानंतर तसे ठेवायचे नाही असे बोलून त्याने त्याच्याकडे असलेल्या प्लास्टिकच्या पिशवीत ठेवतो, असे सांगितले.

त्याने त्या पिशवीत न ठेवता प्रगती यांना फसवून चार सोन्याच्या बांगड्या घेऊन तो निघून गेला. फसवणूक झाल्यानंतर अज्ञात व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## निवडक

### शेडूंग येथून तरुणीचे अपहरण

**पनवेल :** सोळा वर्षीय तरुणीचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बी एन एस कलम १३७ (दोन) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. धर्मेंद्र सिंग महतो हे शेडुंग येथील चाळीत राहत असून त्यांची मुलगी, पत्नी यांच्यासह ते कडी लावून झोपले होते. त्यांची पत्नी रात्री अकराच्या सुमारास उठली असता त्यांची मुलगी दिसून आली नाही व दरवाजाची कडी बाहेरून लावली होती. आजूबाजूला चौकशी केली असता मुलगी दिसून आली नाही. तिचा रंग गोरा, उंची पावणे पाच फूट, बांधा सडपातळ आहे. तिने अंगात हिरवा टॉप आणि काळी जीन्स पॅन्ट घातली असून तिला हिंदी आणि भोजपुरी भाषा बोलता येते. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### विवाहिता बेपत्ता; पोलिसांत तक्रार

**पनवेल :** घरातून खारघर येथे कामाला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात



करण्यात आली आहे. सुश्मिता संजय पावटे (वय ३०) असे तरुणीचे नाव असून उंची अंदाजे पाच फुट, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे असून अंगात राखाडी रंगाचा पंजाबी कुडता व पांढऱ्या रंगाची लेगीज घातलेली आहे. तिच्यासोबत पर्स आहे. तिला मराठी, हिंदी भाषा अवगत आहे व मोबाईल फोन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार सुनील माने यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे असून, तो फिरस्ता व्यक्ती असल्याचे पोलिसांची प्राथमिक माहिती आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जि.प.शाळांमध्ये मोफत वह्यावाटप

**पनवेल :** मनसेचे पनवेल तालुका उपाध्यक्ष आणि खेरणे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तसेच विद्यमान सदस्य कैलास माळी यांच्यावतीने तळोजा औद्योगिक वसाहतीतील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले. तळोजा वसाहतीतील पालेखुर्द, आंबे, चिंचवली येथील जिल्हा परिषद शाळेत हे वाटप करण्यात आले. या वेळी भास्कर माळी, गणेश माळी, दुर्वास पाटील, जयेश दुर्गे, रोहन रंधवी, रोहित उलवेकर, गुरू मुंढे, रूतिक मुंढे, केतन मुंढे आदी उपस्थित होते.

# पनवेल मनपातर्फे नियमित लसीकरण कार्यक्रमाबाबत मुख्यालयात बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत UWIN पोर्टलच्या माध्यमातून नियमित लसीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यासाठी शहर कृती समितीची बैठक मुख्यालयात आयोजित करण्यात आली.



या बैठकिस उपायुक्त डॉ. वैभव विधाते, वैद्यकिय आरोग्य विभाग प्रमुख डॉ. आनंद गोसावी, माताबाल संगोपन अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व वैद्यकिय अधिकारी, जागतिक आरोग्य् संघटनेचे प्रतिनिधी डॉ. अरूण काटकर, एएनएम, एमपीडब्लू उपस्थित होते.

गरोदर माता व बालक लसीकरण विना राहू नये तसेच बालकांचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आता यू विन पोर्टलवर नोंद करून त्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावर ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पालिका कार्यक्षेत्रातील सर्व बालकांचे लसीकरण वेळेत होण्यासाठी याची मदत होणार असून यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

कोरोनामध्ये लसीकरणानंतर नोंद केलेल्या नागरिकांच्या मोबाईलवर संदेश प्राप्त होत होता, कोरोना काळात घेतलेल्या लस संदर्भातील माहिती ज्याप्रमाणे यू विन पोर्टल वर उपलब्ध होती त्याप्रमाणेच आता लसीकरण झालेल्या व न झालेल्या बालकांची माहिती या पोर्टलमुळे मिळणे सोईचे होणार आहे. त्याच धर्तीवर आता बालकांच्या विविध प्रकारच्या लसीकरणातही लस मिळाल्यानंतर नोंदीत मोबाईलवर यू विन पोर्टलद्वारे संदेश येईल. लसीकरणाशी संबंधित सर्व तपशिलांची नोंद पोर्टलवर केली जाईल. लाभार्थ्यास कोणत्याही राज्यात अथवा जिल्ह्यात लसीकरणाचा लाभ घेताना कोणतीही अडचण येणार नाही. या पोर्टलच्या माध्यमातून एका क्लिकवर लसीकरणाशी संबंधित माहिती मिळणार आहे.

### गोवर व रूबेलाबाबत चर्चा

*याचप्रमाणे झिरो डोस म्हणजे बालकाने जन्मल्यापासून एकही डोस घेतला नाही अशा बालकांना शोधून त्यांचे लसीकरण करण्यासाठी सर्वेक्षण करण्याबाबतची माहिती वैद्यकिय आरोग्य विभाग प्रमुख डॉ. आनंद गोसावी यांनी दिली. याबरोबर गोवर व रूबेला लसीकरणाबाबत या वेळी चर्चा करण्यात आली.*

### कर्मचाऱ्यांना सूचना

*पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्‌भवण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर कंटेनर सर्वे करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन भेट द्यावी, अशा सूचना उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिल्या.*

# अक्षता, यशश्रीच्या न्यायासाठी रॅली

**उरण : वार्ताहर**

नवी मुंबई बेलापूर येथील अक्षता म्हात्रे व उरण येथील यशश्री शिंदे यांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्या नराधमांना तातडीने फाशीची शिक्षा मिळण्यासाठी उरण तालुक्यातील मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा येथील आई माऊली महिला ग्राम संघातर्फे जनजागृती रॅली बुधवारी (दि.३१) काढण्यात आली.

दुपारी राजीप मराठी शाळा मुळेखंडपासुन पुढेतेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा या ठिकाणी फिरून परत राजीप शाळेत रॅलीचा समारोप करण्यात आला. ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्याकरिता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आई माऊली महिला ग्राम संघाचे सदस्य, महिला बचत गटातील महिला वर्ग, नागरिक, मुल व मुली सहभागी झाले होते.



# पनवेलमध्ये दोन दिवसीय नाट्य महोत्सव; मोफत प्रवेशिका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप जनता पक्ष सांस्कृतिक प्रकोष्ठ उत्तर रायगड आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दोन दिवसीय नाट्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ६ व ७ ऑगस्ट रोजी सुप्रसिद्ध अशा दोन नाटकांचे चार प्रयोग नागरिकांना मोफत पहावयास मिळणार आहेत.

मराठी रंगभूमीवरील अजरामर विनोदी नाटक ऑल दि बेस्ट चा प्रयोग ६ व ७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता होणार असून शालेय मुलांकरीता विशेष सध्याचे धमाल विनोदी बहुचर्चित नाटक आज्जीबाई जोरात ६ व ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ८ वाजता सादर होणार आहे.

या नाटकाचे प्रवेश विनामुल्य असून विनामुल्य प्रवेशिकांसाठी अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३), वैभव बुवा (९०२९४१०६९९) यांच्याशी संपर्क साधावा. यासोबतच सर्व पनवेलकर रसिक प्रेक्षकांनी आणि छोट्या दोस्तांनी जरूर लाभ घ्यावा, असे आवाहन भाजप जनता पक्ष सांस्कृतिक प्रकोष्ठ उत्तर रायगड आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# 'सीकेटी'त करिअरविषयक मार्गदर्शन व रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे. याचाच एक भाग म्हणून दहावी-बारावी च्या विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन शिबिर आणि पाचवी ते पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन शनिवारी (दि.३) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), खांदा कॉलनीच्या संकुलात नियोजीत आहे.

इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना दहावी, बारावी नंतरच्या करिअरच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी माजी आ.ए.एस. अधिकारी आणि चाणक्य मंडल परिवार, पुणे चे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन सत्र व विद्यार्थी संवाद शनिवारी सकाळी ठीक ११ वाजता होणार आहे.

याबरोबर पाचवी ते पदवी उत्तीर्ण उमेदवारांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन दुपारी १२ ते ५ दरम्यान केले असून यामध्ये विविध क्षेत्रातील नामांकित कंपन्या या रोजगार मेळाव्यात सहभागी होणार आहेत. उपरोक्त दोन्ही कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर असतील.

प्रस्तुत दोन्ही कार्यक्रमांच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस. के.पाटील यांनी पनवेल व सभोतालच्या परिसरातील शाळा आणि कनिष्ट महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन शिबिरात व युवकांना अधिकाधिक संख्येने रोजगार मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सीकेटी महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख डॉ. जे. एम. पावरा, स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे, प्लेसमेंट कक्षाचे अध्यक्ष प्रा. एस.एस. कांबळे, प्लेसमेंट आणि ट्रेनिंग अधिकारी आरती कागवडे, क्रीडा संचालक डॉ. व्ही. बी. नाईक, प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग विशेष परिश्रम घेत आहेत.

# महेश साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांचा वाढदिवस ८ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे.



वाढदिवसानिमित्त सकाळी ११ वाजता वृक्षारोपण, दुपारी १ वाजता साड्या वाटप, ३ वाजता गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ (रा.जि.प. शाळा, वडघर) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील कार्यकर्तांचा सत्कार, सायंकाळी ७ वाजता वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा (प्रबुध्द बुध्द विहार, रमाबाई नगर, वडघर) होणार आहे.

या कार्यक्रमांना वडघर प्रबुद्ध बुद्ध विहारचे अध्यक्ष चंद्रकांत कांबळे, अरुण जाधव, विजय धोत्रे, अशोक वाघमारे, मनोज कांबळे, निलेश कांबळे, अमित वाघमारे, समाधान कांबळे, चंद्रकांत वेळास्कर, विलीप नाईक, भारत वाताड, अशोक कदम, मयुर गायकवाड, आसिफ शेख, सुजित जाधव आदींचे सहकार्य लाभणार आहे.

## पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील शिरवली-भेकरेवाडी या ठिकाणी धबधब्यावर पोहण्यासाठी गेलेल्या वीस वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

गुड्डू कुमार (रा. नितळस, मूळ रा. बिहार) असे मृत तरुणाचे नाव आहे. सातजण शिरवली-भेकरेवाडी येथील धबधब्यावर पोहण्यासाठी गेले होते. गुड्डू कुमार याला पोहता येत नव्हते. पाण्याचा प्रवाह वाढल्याने तो अडकला. त्याला वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तो पाण्यात बुडाला. दुसऱ्या दिवशी तो मृतावस्थेत काम सुरू असलेल्या कामगारांना दिसून आला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## संपादकीय

# कोकणात ही चूक नको

केरळच्या वायनाड जिल्ह्यातील मेपाडीच्या डोंगराळ भागात सातत्याने कोसळणाऱ्या मुसळधार पावसानंतर मंगळवारी पहाटे भूस्खलनाची मालिका सुरू झाली आणि चार गावे चिखलाच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली. या नैसर्गिक आपत्तीतील मृतांची संख्या एव्हाना दोनशेच्या वर गेली असून हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. पश्चिमी घाटातील अनेक भागांना अशा भूस्खलनाचा धोका असून तेथील नागरिकांचे वेळीच अन्यत्र स्थलांतर करणे आवश्यक आहे हे या दुर्दैवी घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**केरळच्या वायनाड जिल्ह्यात गेले दोन आठवडे सतत पाऊस सुरू होता. सोमवारी मध्यरात्री कमी वेळात अतिवृष्टी झाली. इतका पाऊस झाला की, पादिंजराथरा धरणाजवळ ३३३ मिमी पावसाची नोंद झाली. आधीच दरडप्रवण क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागात मंगळवारी पहाटेपासून भूस्खलनाची मालिकाच सुरू झाली. भूस्खलनामुळे नदीतील पाण्यात अचानक वाढ होऊन 'फ्लॅशफ्लड' येत असल्याने तेथील जिल्हा प्रशासन सज्ज होते. पण ही सज्जता उपयोगाची ठरली नाही. त्याऐवजी वेळेत तिथल्या लोकांचे स्थलांतरच केले असते तर बरे झाले असते असे आता स्पष्ट झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यासंदर्भातील माहिती आज संसदेसमोर ठेवली. वायनाड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे आपत्तीसदृश परिस्थिती उद्‌भवू शकते याची कल्पना केंद्र सरकारने केरळ सरकारला २३ तारखेलाच दिली होती. २४ व २५ रोजी पुन्हा इशारा देण्यात आला. २६ तारखेला भूस्खलनाची शक्यताही व्यक्त करण्यात आली. केंद्राने मदतकार्यासाठी एनडीआरएफच्या नऊ तुकड्याही याच काळात केरळला रवाना केल्या होत्या. देशाने तब्बल दोन हजार कोटी रूपये खर्चून नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना देणारी यंत्रणा विकत घेतली आहे. आजच्या घडीला जगातील केवळ चार देशांकडे इतकी आधुनिक पूर्वसूचना यंत्रणा आहे, जी तब्बल सात दिवस आधी अशा आपत्तींचा इशारा देऊ शकते, परंतु केरळ सरकारने या पूर्वसूचनांनुसार लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याची कार्यवाही केली नाही. यावर केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी ही वेळ आरोप-प्रत्यारोपांची नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अतिवृष्टीचा रेड अलर्ट भूस्खलनाची घटना घडल्यानंतर देण्यात आला. पून्नप्रा वा चलियार नद्यांना पूर येऊ शकतो असा इशाराही मिळाला नव्हता असा त्यांचा दावा आहे. यासंदर्भातील अधिक तपशील कदाचित येत्या काही दिवसांत बाहेर येतील. तूर्तास केंद्र आणि राज्य सरकार अशा दोहोंच्या यंत्रणा तेथे संपूर्ण समन्वयाने मदतकार्य करीत आहेत. जवळपास २०० जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून शेकडो जखमींना रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे. अनेक कुटुंबांचे सर्वस्व चिखलाखाली गाडले गेले असून त्यांना आता शून्यातून आयुष्याची सुरूवात करणे भाग पडणार आहे. दरम्यान पश्चिमी घाटाविषयीचे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांनी, आपण आपल्या अहवालात तीन निरनिराळ्या तीव्रतेचे संवेदनशील भाग स्पष्ट केले आहेत व आता भूस्खलन झालेला भाग हा अतिसंवेदनशील म्हणून नोंदला होता याकडे पुन्हा लक्ष वेधले आहे. अतिसंवेदनशील भागामध्ये पर्यटनाच्या नावाखाली मोठाले तलाव बांधणे, रिसॉर्टउभारणीसाठी प्रचंड खोदकाम करणे हे अतिशय धोक्याचे आहे याचाही पुनरूच्चार त्यांनी केला असून केरळने केलेली चूक कोकणात वा पश्चिमी घाटावरील अन्य संवेदनशील भागांमध्ये होऊ नये याकरिता सुजाण नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी जागे होण्याची गरज आहे.**

# साखर सुतारवाडी, केवनाळे दरडग्रस्त पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत









**खबरबात**
**शैलेश पालकर**

२०२१ साली पोलादपूर तालुक्यातील साखर ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सुतारवाडी आणि देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे येथे दरड कोसळल्यानंतर अद्याप तेथील ग्रामस्थांचे पुनर्वसन झालेले नाही. शासनाने पावसाळी अधिवेशनापूर्वी तीन कोटी ९४ लाख ६० हजारांचा निधी उपलब्ध केला, मात्र यानंतर सरकारमध्ये बदल झाल्याने पुनर्वसनाची प्रक्रिया लांबणीवर पडली आहे.

पोलादपूर तालुक्यातील केवनाळे येथे २०२१ जुलैमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे साखर-सुतारवाडी येथील घरावर दरड कोसळून जीवितहानी झाली आहे. यामध्ये चार बाधित कुटुंबांपैकी पाच जणांचा मृत्यू झाला असून तीन पुरूष आणि दोन महिलांचा समावेश आहे. सहा जण जखमी झाले तर १७ जनावरे मृत झाली आहेत. याठिकाणी जेएसडब्ल्यू कंपनीच्या सात कंटेनरमध्ये खासगी जागेत पुनर्वसन करण्यात आले आहे. साखर सुतारवाडी येथे भूसंपादनकामी ६४ लक्ष २८ हजार १४८ रूपये शासनाकडून प्राप्त झाले असून दोन लाख ५० हजार ८७० रूपये कंटेनरसाठी, चौथरा उभा करण्यासाठी आणि नळपाणीपुरवठा योजना करण्यासाठी दोन लाख ७९ हजार ८२१ रूपये खर्च करण्यात आले असल्याची खात्री पाहणी दौऱ्यामध्ये तहसिलदार घोरपडे यांनी केली. केवनाळे येथे पूर्णत: बाधित सात घरे आणि अंशत: बाधित २२ घरे असताना अंशत: बाधितपैकी १० घरांना अनुदान वाटप करण्यात आले आहे, मात्र या वेळी १२८ घरांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली असून जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियातर्फे यांच्या अहवालानुसार ३-७६-९१ हे.आर. क्षेत्राची सक्तीच्या भूसंपादनासाठी शिफारस करण्यात आली आहे.

दुसरे दरडग्रस्त गाव असलेल्या साखर सुतारवाडीमध्ये सहा मृत आहेत. १२ घरे पुर्णत: आणि १० घरे अंशत बाधित असून सुतारवाडी येथे ३८ घरांचे ४४ कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे. येथील २३० लोकसंख्येपैकी ११८ पुरूष आणि ११२ महिला असून १२ घरांचे पुर्णपणे नुकसान तर १० घरांचे अंशत: नुकसान झाले. सात बाधित कुटुंबांपैकी पाच जण मृत झाले असून तीन पुरूष आणि दोन महिलांचा समावेश आहे. १६ जण जखमी झाले तर ३२ जनावरे मृत झाली आहेत. सुतारवाडी येथे कायमस्वरूपी पुनर्वसनाकामी साखर सुतारवाडी येथे भूसंपादनकामी ३८ लक्ष ४१ हजार ७८६ रूपये शासनाकडून प्राप्त झाले असून दोन लाख ५४ हजार ८७० रूपये कंटेनरसाठी चौथरा उभा करण्यासाठी आणि नळपाणीपुरवठा योजना करण्यासाठी दोन लाख ५४ हजार ८७० रूपये खर्च करण्यात आले असल्याची खात्री पाहणी दौऱ्यामध्ये तहसीलदार घोरपडे यांनी केली. खासगी मालकांच्या संमतीने १-८४-०० हेक्टर आर या क्षेत्राचे निश्चिती करण्यात आली, पण ती जीएसआयच्या सर्व्हेनुसार नाकारण्यात आली. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियातर्फे यांच्या अहवालानुसार ०२-२७-९० हे.आर. क्षेत्राची सक्तीच्या भूसंपादनासाठी शिफारस करण्यात आली. याबाबत स्वत: तहसीलदार घोरपडे यांनी शासनाचे आणि जीएसआयचे अहवालानुसार दोन्ही दरडग्रस्त गावांची पाहणी केली. यावेळी महसूल खात्यातर्फे तहसीलदार आणि तलाठी यांनी स्थानिक ग्रामस्थांशी चर्चा केली.


केवनाळे आणि सुतारवाडी येथील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनकामी दोन वर्षांनंतरही शासनाकडून निधीची उपलब्धता न झाल्याने दरडग्रस्तांना कंटेनरच्या तात्पुरत्या निवासामध्ये ऊन, पाऊस आणि थंडीचा सामना करीत जगावे लागले आहे. शासनाकडून भुसंपादन आणि नागरी सुविधांसाठी निधी वितरित केला असून २४ जुलै २०२३ रोजी शासन निर्णय क्रमांक: दग्रपु ३१२३-४१-प्रक्र-३२-र-५ अन्वये कायमस्वरूपी पुनर्वसनाच्या प्रस्तावास मान्यता देताना शासनाने तीन कोटी ९५ लाख ६० हजार रूपयांचा निधी मंजूर केल्याचे परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकानुसार देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे येथे पुनर्वसनासाठी १२८ घरांची संख्या निश्चित करून प्रत्येकी दोन लाख ३० हजार रूपयांप्रमाणे दोन कोटी ९४ लाख ४० हजार रूपयांचा निधी तर साखर सुतारवाडी येथे पुनर्वसनासाठी ४४ घरांची संख्या निश्चित करून प्रत्येकी दोन लाख ३०हजारांप्रमाणे एक कोटी एक लाख २० हजार रूपयांचा निधी असा एकूण १७२ घरांच्या पुनर्वसनाचा निधी मंजूर केला आहे, मात्र गेल्या दोन वर्षांत ज्या दरडग्रस्तांची घरे पूर्णत: अथवा अंशत: बाधित आहेत आणि जी घरे अजिबात बाधित नसताना केवळ दरडग्रस्त गावांमध्ये उभी आहेत. अशांसाठी पुनर्वसन घरकुलांचा निधी उपलब्ध झालेला आहे.

पूर्णत: अथवा अंशत: बाधित घरांतील दरडग्रस्त कुटुंबियांना इमारती धोकादायक झाल्याने दोन वर्षांमध्ये स्थलांतरीत होऊन अन्यत्र भाड्याने घरकुले घ्यावी लागली आहेत. त्यामुळे या गावातील दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी सरकारने या कामासाठी नियोजनबद्ध विकास करण्याची गरज आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलच्या निर्मितीमध्ये शेक्सपियर प्रेरणास्त्रोत



कोणता सण कधी आहे, फोटोसाठी कॅप्शन ते ऑफिसचे काम, शाळेचा अभ्यास करताना पडणाऱ्या असंख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपण आता सर्च इंजिन गुगलवर अवलंबून असतो, पण तुम्ही कधी विचार केला आहे का गुगल कसे, कोणी व का तयार केले असेल? नाही तर नुकतेच याचे गुपित अब्जाधीश रिचर्ड ब्रॅन्सन यांनी उघड केले आहे.

अब्जाधीश रिचर्ड ब्रॅन्सन यांनी लिंक्डइनवर एक पोस्ट शेअर केली. त्यात एक प्रश्न व भलेमोठे उत्तर होते. तर हा प्रश्न असा होता की, तुम्हाला तुमच्या करिअरमध्ये प्रेरणा कुठून मिळाली? याबद्दल सांगताना त्यांनी लिहिले की, जगातील सर्वांत मोठ्या कंपनीच्या म्हणजेच गुगलच्या स्थापनेत शेक्सपियरची मोठी भूमिका होती आणि ही गोष्ट ते कधीच विसरणारसुद्धा नाहीत.

अब्जाधीश रिचर्ड ब्रॅन्सन यांनी पुढे म्हटले की, या संवादाच्या वेळी दोघेही व्हर्जिन व्हॉयेज क्रूझवर होते. त्या काळात आस्क जीव्स हे इंटरनेटचे सर्च इंजिन होते. येथे सर्च करण्याव्यतिरिक्त लोकांना त्यांच्या प्रश्नांना अचूक शब्दबद्ध प्रश्न म्हणून फ्रेम करावे लागायचे. जीव्स हे सर्च इंजिन एक जुन्या पद्धतीचा बटलर म्हणून काम करायचे.

जगप्रसिद्ध ब्रिटिश नाटककार विल्यम शेक्सपियर यांनी डेन्मार्कचा राजकुमार हॅम्लेट याच्या आयुष्यातील दु:खद घटनांवर एक काल्पनिक शोकांतिका लिहिली होती. त्या शोकांतिकेचे नाव 'हॅम्लेट' असे होते. या नाटकात त्यांनी म्हटलेला, टू बी, ऑर नॉट टू बी हा डायलॉग होता. हे पाहता, गूगलचे सह-संस्थापक सर्गे ब्रिनने यांनी 'आस्क जीव्स'वर 'टू बी ऑर नॉट टू बी' शोधण्याचा निर्णय घेतला. सेर्गे ब्रिन काय शोधत आहे हे पाहण्यासाठी 'जीव्स'देखील धडपडत होते आणि हीच गोष्ट सर्जे व लॅरी पेज यांना गुगल तयार करण्याच्या प्रेरणेचा भाग ठरली. त्यांना अशी एक साईट आणायची होती, जी सगळे सर्च टर्म कव्हर करू शकेल. मग तुम्ही तिथे कोणताही कीवर्ड टाकला तरीही मग लॅरी पेज व सर्गे ब्रिन या संशोधकांनी गूगलची निर्मिती केली. ४ सप्टेंबर रोजी टायटॅनिक या जहाजाचे ७३ सालापूर्वीचे फोटो सापडल्यामुळे गुगल पहिल्यांदा जगासमोर आले होते.

# कथाकार, कादंबरीकार श्री.ज. जोशी



**निमित्त**

पुण्यात १ ऑगस्ट १९१५ रोजी जन्मलेले श्रीकृष्ण जनार्दन जोशी हे लोकप्रिय, सिद्धहस्त लेखक आणि अस्सल पिढीजात पुणेकर! १२५ वर्षांपासून त्यांचे घराणे पुण्यात सदाशिव आणि नारायण पेठेत वास्तव्य करून असलेलं. त्यामुळे आधी वडिलांकडून जुन्या पुण्याच्या गमतीदार हकीकती त्यांनी ऐकल्या होत्या. समाजाचे परिवर्तन आधी वडिलांकडून ऐकून आणि पुढे स्वतः प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे 'श्रीजं'कडे भरपूर किस्से जमा झाले होते, तशात गोष्टीवेल्हाळपणा वारशानेच चालत आलेला. त्यामुळे 'श्रीजं'नी तो गोष्टीरूपाने उतरवला नसता तरच नवल!

मराठी साहित्यामध्ये अनेक नररत्नांनी आपले योगदान दिले आणि साहित्य क्षेत्र समृद्ध केले. यामध्ये लेखकांनी वेगवेगळे साहित्य प्रकार हाताळत साहित्याची निर्मिती केली. यामध्ये श्रीकृष्ण जोशी यांचेही नाव येते. त्यांनी वेगळ्या पद्धतीने लेखन केले.

'श्रीजं' हे मुंबई विद्यापीठातून बीए (१९३८) झाले. त्यांनी डिफेन्स अकाऊंटस् विभागात नोकरी केली. सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात गोविंदराव तळवलकरांनी 'मी पुण्याहून लिहितो की...' अशी एक लेखमालाच त्यांच्याकडून वर्षभर लिहून घेतली होती. 'श्रीजं'च्या लहानपणी 'सिटी पोस्टापलीकडे पुणे नाही आणि पुण्यापलीकडे महाराष्ट्र नाही' असं म्हटलं जाई. त्यामुळे अंगात पुण्याबद्दलचा जाज्वल्य अभिमान असलेल्या 'श्रीजं'नी पुण्याबद्दल अत्यंत आपुलकीनं आणि प्रेमानं भरपूर लेखन केलं आहे. त्यांचं लेखन अत्यंत ताजं आणि टवटवीत असतं. 'पुण्यात दुमजली बस येते', 'हुजूरपागेच्या मुली', 'ओंकारेश्वर ओंकारेश्वरी गेले',' पीएमटी एक संकीर्तन', 'सदाशिव पेठ साहित्यपेठ' अशांसारखी त्यांच्या लेखांची शीर्षकंही पुणेकरांना जवळची असत. पांढरपेशा समाजामध्ये गेल्या शंभर-दीडशे वर्षांत झालेले परिवर्तन त्यांच्या बहुतेक कथांमधून त्यांनी अत्यंत लालित्यपूर्ण भाषेत केले आहे.

'आनंदी गोपाळ' आणि 'रघुनाथाची बखर' या त्यांच्या अत्यंत गाजलेल्या कादंबऱ्या! पुणेरी, भरती ओहोटी, जोशीपुराण, माझ्या साहित्याचा बॅलन्सशीट, श्रीकृष्णकथा भाग एक ते सहा, स्थावर, वृत्तांत, सुचले... लिहिले, सुलभा, ऐलमा पैलमा, ओलेता दिवस, सुलभा, सूर्यापोटी, मामाचा वाडा अशी त्यांची ५०हून अधिक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

कनिष्ठ मध्यमवर्ग हा त्यांच्या लेखनाचा गाभा होता. 'आनंदीगोपाळ' या कादंबरीने चरित्रात्मक कादंबरीचा प्रवाह मराठीत आणला. त्यांच्या 'यात्रा' या कादंबरीवरून 'साळसूद' नावाची दूरदर्शन मालिका प्रसारित करण्यात आली. 'रघुनाथाची बखर' या कादंबरीवरून 'व्यासपर्व' हा चित्रपट तयार झाला. आनंदी गोपाळ या कादंबरीला राज्य शासनाचा ह.ना. आपटे पुरस्कार व अन्य काही पुरस्कारही मिळाले. १३ जानेवारी १९८९ रोजी त्यांचे निधन झाले. **-साभार इंटरनेट**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : सध्या पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने काशिद बीचवरील स्टॉल बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे एरव्ही गजबजलेला हा परिसर सुना सुना वाटत आहे.** (छाया : नितीन शेडगे)

## आरोग्य प्रहर

# गरोदरपणात सर्दी, खोकला झाल्यास काय करावं?

आजीबाईंचा बटवा हे तुम्ही आजवर अनेकदा ऐकलं असेल. आई-आजीच्या जुन्या युक्त्यांना आपण कधीच नाही म्हणणार नाही किंवा त्यावर अविश्वासही दाखवणार नाही, पण या हेल्थ हॅकबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी तज्ज्ञांशी संवाद साधला आणि हा घरगुती उपाय वा जुगाड गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे की नाही हे शोधून काढले.



ओव्यामध्ये थायमॉल असते, ज्यामध्ये दाहकविरोधी आणि प्रतिजैविक गुणधर्म असतात. थायमॉल तुमचे नाक साफ करण्यास, घशाची जळजळ कमी करण्यास मदत करते. तर होय, ओवा गरम करून तो रुमालात घालून, त्याचा बटवा बनवून वास घेणे सर्दी आणि खोकल्याची लक्षणे कमी होण्यास मदत होते, असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले आहे.

आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉ. अंशु वात्स्यायन म्हणाले की, हा ओव्याचा बटवा शरीर व डोकेदुखी बरं करू शकते. बाळंतपणानंतर हा उपाय महिलांसाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो. हा बटवा तयार करण्यासाठी तुम्ही ओव्याच्या बिया तव्यावर भाजून किंवा कोमट पाण्यात भिजवून घेऊ शकता. बटवा बनवण्यासाठी ओवा अर्धा चमचापेक्षा जास्त घेऊ नका, अशी त्यांनी शिफारस केली आहे.

आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉ. अंशु वात्स्यायन आणि पोषणतज्ज्ञ ईशा लाल या दोघांनीही मान्य केले की, ओव्याचा बटवा गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे. जर तुम्हाला गर्भधारणेदरम्यान इंग्रजी औषधे खायची नसतील आणि त्याचे दुष्परिणाम सहन करायचे नसतील, तर ओव्याचा बटवा तुम्हाला ठराविक औषधांशी संबंधित होणाऱ्या दुष्परिणामांपासून आराम देईल, पण तुम्हाला खात्री नसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे, त्यांच्याकडून तपासून घेणे केव्हाही उत्तम ठरेल, असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल म्हणाल्या आहेत.

पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले की, गर्भवती महिला आठवड्यातून दोन किंवा तीन वेळा सुरक्षितपणे ओव्याचा बटवा वापरू शकतात, पण अस्वस्थता टाळण्यासाठी अतिवापर करणे टाळा, असेही त्या पुढे म्हणाल्या आहेत. त्यामुळे गर्भवती महिलांनी आवश्यकतेनुसार कार्यवाही करावी.

# कर्जतमधील वीज समस्यांबाबत समितीची चर्चा

## समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने ग्राहक आक्रमक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका वीजेच्या समस्यांनी त्रस्त आहे. तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीच्या वतीने २० जुलै रोजी मूक मोर्चा काढण्यात आला होता. समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांनी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता प्रकाश देवके यांची भेट घेऊन चर्चा केली, मात्र चर्चेअंती समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने समितीचे सदस्य आक्रमक झाले आहेत.

कर्जत शहरात पाण्याचा मोठा प्रश्न आहे. तो सोडविण्यासाठी आवश्यक असलेला एक्स्प्रेस फिडरसाठी महावितरण तसेच कर्जत नगर परिषदेने पत्रव्यवहार तसेच शासन स्तरावरसुद्धा प्रयत्न केले नाहीत, तसेच अंडर ग्राउंड लाईटसाठीसुद्धा काही तयारी नाही. जुने झालेले तसेच गंजलेले पोल बदलण्याची कुठलीही तयारी नाही. नव्याने आवश्यक असलेले डीपी व ट्रान्सफॉर्मर याचे शासनाकडे मागणीचा प्रस्ताव तसेच त्याची लेखी माहिती दिलेली नाही. तालुक्याला चार इनकमर हवेत याबाबत मागणीचा प्रस्ताव शासनाकडे केलेला नाही.

संपूर्ण तालुक्यात जास्त फिडर लोडप्रमाणे असले पाहिजेत यासाठी प्रयत्न केलेला नाही. नेरळ, माथेरानमध्ये जुने खांब, तारा, ट्रान्सफॉर्मर याचे इन्स्पेक्शन झालेले नाही व त्याची माहितीसुद्धा उपलब्ध नाही. रिडींग घेणेसाठी तसेच बिले वाटप करण्यासाठी एजन्सी नेमलेली आहे. सर्व विभागात आठ इंजिनिअर आहेत. नियमाप्रमाणे त्यांनी कार्यक्षेत्रात राहणे बंधनकारक आहे, परंतु ते कर्जतच्या बाहेर राहतात. त्यामुळे आपल्या रात्रीच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही व जनता रात्रभर अंधारात राहते. ग्राहकांच्या तक्रारी सोडविणेसाठी कंझ्युमर फोरम आहे, परंतु त्यासाठी बसलेले कर्मचारी आपल्या तक्रारीची दखल घेत नाहीत व उडवाउडवीची उत्तरे देतात.

पाच ठेकेदार विविध कामे करण्यासाठी नेमलेले आहेत. त्यांचेवर महावितरणचा काही कंट्रोल असल्याचे दिसले नाही, असे संघर्ष समितीचे म्हणणे आहे. या वेळी कर्जत वीज ग्राहक संघर्ष समितीचे संयोजक अ‍ॅड. कैलास मोरे, प्रवीण गांगल, रंजन दातार, रमाकांत जाधव, प्रशांत उगले, प्रभाकर गंगावणे, योगेश पोथरकर, सोमनाथ पालकर हरेश सोनावळे, हरिश्चंद्र यादव, अ‍ॅड. भावना पवार यांनी चर्चेत सहभाग घेतला. महावितरण कंपनीकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने कर्जत वीज ग्राहक संघर्ष समिती आंदोलनाची दिशा काही दिवसात निश्चित करेल, असे अ‍ॅड. मोरे यांनी जाहीर केले आहे.



कर्जतमधील समस्यांबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा झाल्यावर काही प्रश्न थोड्याच कालावधीमध्ये सोडवू तर काही प्रश्नांची उडवडीची उत्तरे दिली, मात्र याबाबत त्यांनी लेखी देण्याचे टाळले.

**–कैलास मोरे,**
कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समिती

कर्जत आणि ग्रामीण आरडीएसएसचे सुमारे ३३.५० कोटींचे प्रपोजल केंद्राकडे पाठवले आहे. त्यापैकी कर्जत तालुक्यात साडेअकरा करोड चे फिडरचे काम सुरू आहे. सात ते आठ महिन्यात हे काम पूर्ण होईल, त्यामुळे बरेचसे प्रश्न मार्गी लागतील.

**–प्रकाश देवके,**
उपकार्यकारी अधिकारी, महावितरण

**जाहीर नोटीस**

जाहीर सुचना देण्यात येत आहे की, माझे अशिल मे. शगुन व्हेंचर्स तर्फे भागीदार १. श्री. पियुश प्रागजी पटेल २. श्री. प्रागजी रणछोड पटेल ३. श्री. हरेश आनंदजी पटेल ४. श्री. शैलेश आनंदजी पटेल ५. श्री. भुपत माधवभाई मावानी ६. श्री. निशिथ भुपत पटेल ७. श्री. जेठालाल रणछोड पटेल ८. श्री. यश जेठालाल पटेल कार्यालय - शॉप नं. १, ईन्सिगनिआ, नियर अभ्युदय बँक, प्लॉट नं. १९५, सेक्टर-१९, उलवे, नवी मुंबई, हे खालील नमुद भुखंडातील ५०% (अविभाज्य भाग) हक्क, हितसंबंध त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याचा विचार करत आहेत. सदरचा भूखंड ज्यांना हस्तांतरीत करण्यात आला आहे त्यांचे नाव असे आहे १. श्री. महाबिर गुप्ता २. श्री. आलेख एच. चंदन ३. श्री. मुरलीधर दत्तात्रय पाटील ४. श्री. संजय दत्तात्रय पाटील रा. ९, वर्धमान चेंबर्स, सेक्टर- १७, वाशी, नवी मुंबई ४००७०५ व सदर भूखंड वाटप सिडको लिमीटेडने संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात असुन ते १२.५% योजनेअंतर्गत देण्यात आलेला आहे. उभय पक्षियांत ठरल्याप्रमाणे सदर भुखंडाबाबत सिडकोची पुर्व परवानगी घेवुन १. श्री. महाबिर गुप्ता २. श्री. आलेख एच. चंदन यांच्या हिश्श्यातील ५०% भुखंडाचा त्रिपक्षीय करार करावयाचा आहे व श्री. मुरलीधर दत्तात्रय पाटील आणि श्री. संजय दत्तात्रय पाटील यांचा सदर भुखंडातील ५०% (अविभाज्य भाग) कायमचा राहणार आहे.

भुखंडाचे वर्णन

सिडको फाईल क्र.- उलवे- १०७५

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| उलवे | ९८ | २१ | २४९९.६६<br>(पैकी ५०% अविभाज्य भाग) |

कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भूखंडासाठी किंवा त्यावर त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सूचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरूप यांची माहीती अन्य तपशीलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भूखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातुन आणि अन्य हक्कापासुन आणि अधिकारापासुन किंवा अन्य प्रकारच्या बंधनापासुन मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडुन देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि माझे अशिल कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर भूखंडातील ५०% अविभाज्य भाग हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करतील.

दि. ०१/०८/२०२४

सचिन एस. तांबट (अ‍ॅडव्होकेट)
२१४, भुमी मॉल, सेक्टर-१५, सी.बी.डी. बेलापुर,
नवी मुंबई-४०० ६१४ फोन नं. (०२२) ४९६४३३६६

# उरण येथील घटनेच्या निषेधार्थ पालीत बंद

**पाली : प्रतिनिधी**

उरण येथे झालेल्या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी (दि.३१) पाली बाजारपेठ कडकडीत बंद पाळण्यात आला, तसेच संबंधित आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी या आशयाचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.


पालीतील बाजारपेठ बंद असल्यामुळे सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळाला तसेच या वेळी तालुक्यातील इतर नागरिकदेखील या ठिकाणी फारसे पाहायला मिळाले नाही. रहदारीदेखील तुरळक होती. समस्त व्यापारी वर्गाने सर्व दुकाने बंद ठेऊन कडकडीत बंद पाळला.

याबाबत तालुक्यातील महायुतीच्या नेत्यांनी पाली व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन बाजारपेठ बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. त्या अनुषंगाने आपली जबाबदारी म्हणून व घडलेल्या गोष्टीचा निषेध म्हणून पाली व्यापारी असोसिएशनने पाली बाजारपेठ पूर्णपणे बंद ठेवली.

पाली सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार यांना निवेदन देताना अनुपम कुलकर्णी, संजय म्हात्रे, श्रीकांत ठोंबरे, संदीप दपके, अलाप मेहता, नरेश खाडे, उत्तम ओसवाल व संजय ओसवाल आदी उपस्थित होते.



## जखमी अजगर नैसर्गिक अधिवासात



**खालापूर** : खोपोलीतील भानवज गावात वनखात्याचे कर्मचारी गस्त घालत असताना दाट झुडुपात अजगर शरीरावर जखमा झाल्याने मरणासन्न अवस्थेत निपचित पडल्याचे आढळला. खालापूर वनअधिकारी राजेंद्र पवार यांच्या सल्ल्यानुसार, जखमी अजगराला पशुवैद्य विष्णू काळे यांनी जखमांवर औषधोपचार करून काही काळ सर्पमित्र, अमोल ठकेकर, अभिजीत घरत, यांनी गुरुनाथ साठेलकर यांच्या निवासस्थानी ठेवले. जखमी अजगर बरा झाल्याची खात्री झाल्यावर त्याची पुन्हा वैद्यकीय तपासणी करून बोरघाटात सोडण्यात आले.

# शिवसेना उपजिल्हा प्रमुखपदी रमेश मोरेंची नियुक्ती

**माणगाव** : श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात शिवसेनेला अधिक बळकटी देण्यासाठी रमेश मोरे यांची उपजिल्हा प्रमुखपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाने त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदारीचा ते शिवसेना श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात अधिक बळकट करण्यासाठी पक्षाला फायदा होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. रमेश मोरे यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी शेकापमधून शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्या कामाची कसोटी आणि हातोटी पाहून सचिव संजय मोरे यांनी त्यांची उपजिल्हा प्रमुखपदी नियुक्ती केली. नियुक्तीचे पत्र आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते देण्यात आले. त्या वेळी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे, पक्षप्रतोद अ‍ॅड. राजीव साबळे, अरुण चाळके, नीलिमा घोसाळकर व पदाधिकरी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पारिजात हाईटस् को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., पनवेल**

**जाहीर नोटीस**

प्रस्तावित सहकारी संस्था इमारत पुनविकास योजनेअंतर्गत अनुभवी सक्षम व योग्य विकासकाकडून जुनी इमारत पाडून पनवेल महानगरपालीका नियमांच्या अधिन राहून नविन इमारत बंधकाम संमधी निविदा मागविण्याबाबत

१) संस्थेचे नांव = पारिजात हाईटस सहकारी गृहनिर्माण संस्था पनवेल
२) सस्थेचा पत्ता = फायनल प्लॉट न २७१ ऊरण रोड पनवोल ४१०२०६
३) संस्था नोंदणी = नोंदणी व आर.जी.डी/ पी.डब्लू.एल/एच.एस.जी (टिसी)१५७९/ ९९– २००० दिनांक ०४/०२/२०००
४) भूखंडाचे वर्णन – एकूण क्षेत्रफळ :– १८११ स्के. मिटर
५) अस्तीत्वात असलेल्या इमारतीतील सदनिका / शॉप संख्या = ४८
६) निविदा उपलब्दता – सदर संस्थेच्या निविदा. दि ०३/०८/२४ ते ०९/०८/२४ चे दरम्यान संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११ ते ०२ वरील नमुद केलेल्या पत्यावर मिळू शकते.
७) निविदा दाखल करणाचे ठिकाण : हे संस्था कार्यालय
८) निविदा स्वीकारणाची अंतिम तारीख ०५/०८/२४ ते १२/०८/२०२४
सोसायटी कार्यालयात सकाळी १० ते ०३ या वेळेत स्विकारण्यात येतील
९) सहकारी संख्या यांच्याकडे कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या इमारत पुर्नविकास समितीस आहे.

सही/– सही/–
सेक्रेटरी / खजिनदार चेअरमन
पारिजात हाईटस् सह. संस्था पनवेल

**जाहीर नोटीस**

मे. ओरिअन ट्रस्ट २२/०७/२०२४ सिडको (नैना) या कार्यालयातून बांधकाम परवानगी मिळाली आहे. सिडको (नैना) च्या निर्देशानुसार जाहीर सुचना देण्यासाठी सामान्य अटींच्या तरतुदीचे पालन करण्यास जाहिर नोटीस देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जमीन मालकाचे नाव आणि पत्ता | मे. ओरिअन ट्रस्ट रा.१, पर्ल मेंशन (एन), ९१ एम. कर्वे रोड, मरीन लाइन्स,मुंबई–४०००२०. |
| वास्तूविशारदाचे नाव आणि पत्ता | मे. स्पेसएज कंसलटंट (देवयानी खाडिलकर), बी–१०६, नटराज बिल्डींग, शिवसृष्टी कॉम्पलेक्स, मुलुंड गोरेगाव लिंक रोड, मुलुंड (प), मुंबई–४०००८०. |
| स्ट्रक्चरल इंजिनीअरचे नाव व पत्ता | अरूण भाकरी कंसल्टंट ट्रक्चरल इंजिनीयर अर्किटेक्टचर कॉर्नर, पहिला मजला, प्लॉट नं.६. एन.एस. १० रोड जुहू, विले पार्ले मुंबई वेस्ट ४०००४९. |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता | युनिक एंटरप्रायजेस, ५८६/ए, गुलटेकडी, अल–अमीन सोसायटी, व्हाइट हाउस बिल्डींग, पुणे–४११०३७. |
| साईट ऑफिसचा पत्ता | अंतिम भुखंड क. २८३ टि. पी. एस.–२ गट नं. १७/४ मौजे चिपळे, ता. पनवेल, गट नं. ४१/२, ४१/३ व ४१/५ मौजे– भोकरपाडा, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६ |
| बांधकाम परवानगी आदेश कं. | CIDCO/NAINA/Panvel/Chipale/BP-००६९१/CC/२०२४/०५३४ दि.२२.०७.२०२४ |
| एफ एस आय परवानगी | २.५ |
| निवासी सदनिकांची संख्या | घरे १००, वाणिज्य १३ |
| मंजुर इमारत आराखडा उपलब्धः– | अंतिम भुखंड क. २८३ टि. पी. एस.–२ गट नं. १७/४ मौजे चिपळे, ता. पनवेल, गट नं. ४१/२, ४१/३, व ४१/५ मौजे– भोकरपाडा, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६ |

SD/-
VIDIP VINOD JATIA

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | काळुंद्रे | १०९ (१२९) | ३९/२ | ०–२९–६ | १०२९ चौ.मी. पुर्णांकात १०५० चौ.मी. | **मौजे करंजाडे भुखंड क्र. ३५, सेक्टर–५A क्षेत्र–१०५० चौ.मी.** | मा. न्यायालयाचे आदेश क्र. RCS-९४/२००४ मधील न्यायालयाच्या निर्णयानुसार **प्रतिवादी क्र.२. श्रीमती भागाबाई शिवराम चिखलेकर (मयत) यांचे वारस**<br>२.१) श्री. वामन शिवराम चिखलेकर,<br>२.२) श्री. दिपक शिवराम चिखलेकर,<br>२.३) कु. दिपाली शांताराम चिखलेकर,<br>२.४) श्री. ऋषिकेश शांताराम चिखलेकर,<br>२.५) श्री. वृशाल शांताराम चिखलेकर,<br>२.६) श्रीमती. निर्मला शिवनाथ घरत<br>३. श्री. वामन शिवराम चिखलेकर<br>४. श्रीमती निर्मला विश्वनाथ घरत<br>५. श्री. शांताराम शिवराम चिखलेकर<br>६. श्री. दिपक शिवराम चिखलेकर<br>**७. कै. श्री. आत्माराम पदू चिखलेकर (मयत) यांचे वारस**<br>a. श्री. तुळशीराम आत्माराम चिखलेकर<br>b. श्री. लिलाधर आत्माराम चिखलेकर<br>c. श्रीमती शारदा केशव डाऊर<br>d. श्रीमती बारकी सखाराम घरत<br>८. श्री. मारुती पदू चिखलेकर | मा. न्यायालयाचे आदेश क्र. RCS-९४/२००४ मधील न्यायालयाच्या निर्णयानुसार वाटपाचे प्रस्तावित आहे. |
| २ | काळुंद्रे | १०९ (१२९)E | ५३/६ | ०–३०–० | | | | |
| ३ | काळुंद्रे | १०९ (१२९) | ६१/१ | ०–५५–० | | | | |
| ४ | काळुंद्रे | १०९ (१२८)D | ६१/५ | ०–३–० | | | | |
| ५ | ४४६ खारघर | ३४५ ओवे | ३४७/४<br>३४७/१<br>३८२/५ | ०–१२–५<br>०–०१–५<br>०–०१–५ | २७५० चौ.मी. पैकी १९०० चौ.मी. वाटप व शिल्लक ८५० चौ.मी. मंजूर पात्रता वाटपाकरिता प्रस्तावित आहे. | भूखंड क्रं.–२, से.–३४A, क्षेत्र– ८४९.८० चौ.मी., नोड–खारघर | मूळ भूधारक कै. महमद शरिफ शमसुद्दीन खानबंदे हे मयत असून त्यांचे मा. न्यायालय, पनवेल यांच्याकडील CIVIL MISC. APPLN. NO. ८५७/१९९६ नुसार वारस म्हणून १. रईस अहमद शरिफ खानबंदे २. श्रीमती. बानुबी मह. शारीफ खानबंदे<br>कै. श्रीमती. बानुबी मह. शारीफ खानबंदे हे मयत असुन त्यांचे मा.न्यायालय, पनवेल यांच्याकडील CIVIL MISC. APPLN. NO. ३७३/२०१० नुसार वारस म्हणून श्री. रईस अहमद मोहम्मद शरिफ खानबंदे यांच्या नावे घोषित केलेले आहे.<br>याअनुषंगाने प्रस्तावित भूखंडाचे वाटप श्री.रईस अहमद मोहम्मद शरिफ खानबंदे यांच्या नावे भूखंड क्रं.–२, से.–३४A, क्षेत्र– ८४९.८० चौ.मी., नोड–खारघर या भूखंडाचे वाटप व करारनामा करण्याचे प्रस्तावित आहे. | विधी सहाय्यक यांनी दिलेल्या अभिप्रायान्वये, सद्यस्थितीत प्रस्तावित निवाडा व इरादित भूखंडाच्या वाटपाबाबत कोणताही प्रलंबित दावा, न्यायालयीन वाद, हरकत असल्याचे दिसून येत नाही. |
| ६ | | ४४६ ओवे | ३७०/२<br>३७१/०<br>३७२/० | ०–७२–६<br>०–३१–६<br>०–२४–३ | | | | |
| ७ | | १७८ ओवे | ३१७/०<br>३१९/५<br>३१६/२ | ०–५९–०<br>०–२२–२<br>०–१३–४ | | | | |
| ८ | | ३४५ ओवे | ३८२/२पै<br>३४७/२पै | ०–५९–०<br>०–१३–४ | | | | |
| | | | एकूण | ३–११–० | | | | |
| ९ | उलवे ५५८ | गव्हाण २२५ | २३७/६ | ०–१६–० | १५० चौ.मी. | **उलवे नोड येथील भुखंड क्र. ४२२, सेक्टर–१९ क्षेत्र–१४९.५ चौ.मी.** | **कै. मोतीराम जानाजी देशमुख (मयत) व कै. लिलाबाई मोतीराम देशमुख (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. महेश मोतीराम देशमुख<br>२) श्री. विलास मोतीराम देशमुख<br>३) श्री. नितीन मोतीराम देशमुख<br>४) श्री. निलेश मोतीराम देशमुख<br>५) श्री. मंगेश मोतीराम देशमुख | -- |
| | | | | **ता.उरण, जि.रायगड** | | | | |
| १ | पागोटे | २३५/८५ -८६ | ५९/५<br>९३/३<br>१२४/४<br>१३०/५<br>७३/१ | ०–१३–४<br>०–१७–०<br>०–०७–६<br>०–०५–८<br>०–१२–६ | **१७०० चौ.मी.** | **मौजे द्रोणागिरी येथील भुखंड क्र. १२६, सेक्टर–४८, क्षेत्र १६९९.५० चौ.मी.** | **कै. श्री. गजानन पांडुरंग पाटील यांचे वारस**<br>**१. श्री. रविंद्र गजानन पाटील**<br>**२. श्री. प्रविण गजानन पाटील**<br>**३. श्रीमती अचलता उर्फ वर्षा वामन ठाकूर**<br>**४. श्रीमती विजया गजानन ठाकूर**<br>**५. श्रीमती वैजयंती संजय पाटील** | निरंक |
| २ | नवघर | १००अ/८५ | ३२३/९<br>३२३/१०<br>३४७/१२<br>३४७/९<br>३४०/७<br>३३६/८<br>३२८/२ब | ०–२१–०<br>०–३०–२<br>०–१९–८<br>०–१०–९<br>०–११–६<br>०–१५–०<br>०–१२–० | | | | |
| ३ | नवघर | १००ब/८५ | ३२४/३ | ०–१७–० | | | | |
| ४ | करळ ३९/८७ | | ११९/७<br>१३५/४ | ०–०२–५<br>०–०४–५ | ६१.२५ चौ.मी. प्रत्येकी भुधारकास अल्पभुधारक म्हणून पूर्णांकात ४० चौ.मी. | भूखंड क्र.१४६, सेक्टर–५२, क्षेत्र– ४० चौ.मी. | निवाड्यावरील सी सी प्रमाणे नावे<br>श्री. रमेश कृष्णा कडू यांचे वारस<br>सुमती रमेश कडू व इतर | निरंक |
| | | | **एकूण क्षेत्र** | **०–०७–०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**तळ मजला, सिडको भवन,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१३१/२०२४–२५

# पनवेलमधील विकास कामांचा आढावा

## महापालिका आयुक्तांकडून विभागप्रमुखांना सूचना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा विभागवार आढावा मंगळवारी (दि.३०) मुख्यालयात झालेल्या बैठकित प्रशासक तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी घेतला. या वेळी विकास कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.

या वेळी सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे, बाबासाहेब राजळे, डॉ.वैभव विधाते, संतोष वारूळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक अधिकारी स्वरूप खारगे, शिक्षणाधिकारी चव्हाण, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

या वेळी खारघमधील खारघरमधील स्काय वॉकवर सोलर पॅनल बसविणेबाबत नियोजन करणे, पनवेल महापालिका कार्यक्रक्षेत्रात इलेट्रिक वाहने चार्जिंग करण्यासाठी ईव्ही मोबोलिटी स्टेशन्स सुरू करण्याबाबत आयुक्तांनी बैठकित चर्चा केली. यासाठी महाप्रीत संस्थेशी संपर्क साधून पुढील माहिती घेण्याचे निर्देश आयुक्तांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महापालिका कार्यक्षेत्रात उर्वरित तीन नवीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेस्तव करारनामा व इतर अनुषंगिक कामे करणे तसेच हिरकणी हॉस्पिटल सुरू केल्यानंतर त्याचा एकुण खर्च व नफा यांचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबत आयुक्तांनी संबधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच पॉलिक्लिनीक मध्ये मणक्याचे आजारांवर उपचार सेवा देण्यासाठी 'ऑर्थो डॉक्टर' यांचा समावेश करण्यावरती बैठकित चर्चा करण्यात आली.

मृतदेह ठेवण्यासाठी शीतगृह उभारण्याबाबत नियोजन करण्याच्या हेतूने त्यासाठीची जागा व इतर गोष्टींवरती आयुक्तांनी बैठकित चर्चा केली. सीबीडी, बेलापूर ते एक्सप्रेस-वे पर्यंत आकर्षक वृक्ष लागवड करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी उपायुक्तांना सूचित केले. पिंक रिक्षा चालविण्यासाठी इच्छुक असणाऱ्या लाभार्थ्यांची नोंद घेऊन त्यांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करण्याच्यादृष्टीने संबधित विभागाला आयुक्तांनी सूचना दिल्या. नाट्यगृहावर होणारा खर्च विचारात घेऊन नाट्यगृहाच्या भाडे आकारणीची पुर्नरचना करण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत संबधित विभागास आयुक्तांनी निर्देशित केले.

या वेळी आयुक्तांनी मालमत्ता कर, अमृत योजनेमधील कामे, अनुदानाचे प्रस्ताव, महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे, मुख्यमंत्री माझी बहिण लाडकी योजना, अल्पसंख्याकांसाठीच्या योजना यांचा आढावा घेतला. दिव्यांगाच्या प्रश्नांवरती चर्चा करून त्यांचे सर्वेक्षण करण्याबाबत आयुक्तांनी संबधित विभागास सूचना दिल्या.

**सफाई कामगारांना नियुक्ती पत्राचे वाटप**

आजच्या बैठकीत आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते महाराष्ट्र शासन निर्णयानुसार वारसा हक्काने पालिकेच्या स्वच्छता विभागात एकुण सात वारसदारांस सफाई कामगार म्हणून नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

# आंध्र प्रदेशचे नगरविकास मंत्र्यांची सिडकोच्या प्रकल्पस्थळांना भेट



**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

आंध्र प्रदेशचे मा. नगरपालिका प्रशासन आणि नगरविकास मंत्री, डॉ. पी नारायण गारू यांनी बुधवारी (दि. ३१) सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना भेट दिली.

प्रकल्प स्थळांना भेट दिल्यानंतर सिडको भवन येथे आंध्र प्रदेशच्या शिष्ट मंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. या वेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, एपीसीआरडीए आयुक्त कटानेनी भास्कर, अतिरिक्त आयुक्त एम. नवीन, प्रवीण चंद, मुख्य नियोजनकार रवींद्र मानकर, मुख्य अभियंता (नवी मुंबई) एन. सी. बायस, अतिरिक्त मुख्य अभियंता प्रभाकर फुलारी, अतिरिक्त मुख्य नियोजनकार आशितोष निखाडे आणि वरिष्ठ नियोजनकार प्रांजली माने यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आंध्र प्रदेश शासनातर्फे आंध्रमधील अमरावीत येथील २१७ चौ.कि.मी. क्षेत्रावर राजाधीनचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण इ. पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधीमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत. या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे.

या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण स्वयंपूर्ण शहरे विकसित करण्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या सिडकोच्या नगर नियोजनातील उत्कृष्ट प्रथा, पद्धती आणि आर्थिक प्रारुपांचा अभ्यास करण्याकरिता सिडकोच्या विविध विकास प्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने या भेटीचे नियोजन सिडकोतर्फे करण्यात आले होते.

# इमारत दुर्घटनेतील कुटुंबाला किशोर पाटकरांतर्फे ५० हजारांची मदत



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बेलापूर, नवी मुंबई येथील इमारत कोसळल्याने यात तिघांचा मृत्यू झाला तर या दुर्घटनेत ५२ जण बेघर झाले असून त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कठीणप्रसंगी नवी मुंबई शिवसेना संपर्कप्रमुख किशोर पाटकर हे येथील रहिवाशांच्या मदतीला धावून आले. त्यांनी प्रत्येक कुटुंबाला ५० हजार रुपयांची भरघोस आर्थिक मदत केली. बेलापूरमधील शहाबाज गावातील इमारत कोसळून मोठी दुर्घटना घडली. यात तिघांचा मृत्यू झाला तर ५२ जण बेघर झाले. नवी मुंबई शिवसेना संपर्कप्रमुख किशोर पाटकर यांनी या ठिकाणची पाहणी केली आणि तेथील रहिवाशांच्या मदतीला धावून आले. त्यांनी इमारतीत राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. किशोर पाटकर यांच्या मदतीचा सर्व कुटुंबीयांना मोठा आधार मिळाला आहे.

दुर्घटनाग्रस्त कुटुंबियांनी किशोर पाटकर यांचे आभार मानले आहेत. दरम्यान, तळोजा येथे राहणाऱ्या रोहिणी राजेश बोटे यांनी रेल्वे खाली पडून पाय गमावलेल्या महिलेला पाटकर यांनी उपचारासाठी पाच लाख रूपयांची मदत केली होती.

# आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करणार -रूपाली चाकणकर

## यशश्रीच्या कुटुंबियांना आश्वासन



**उरण : बातमीदार**

यशश्री शिंदे या उरणमधील तरुणीची एका नराधमाने अत्याचार करून क्रूरपणे हत्या केली. या निर्घृण खुणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ पसरली होती. या गंभीर समस्येची दखल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी यशश्री शिंदेच्या घरी जाऊन तिच्या आई-वडील व नातेवाईकांची भेट घेतली. या वेळी चाकणकर यांनी दोषीवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित पवार गटाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत, उरण तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर, युवा अध्यक्ष समद बोंबले, अमित साहू, संदेश म्हात्रे, दिनेश पाटील, महिला पदाधिकारी शोभा चौगुले, देवकी शिंदे, साधना वाणी, केदारे मॅडम आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी शिंदेच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना रूपाली चाकणकर म्हणाल्या की, दिवसेंदिवस समाजात अशा विकृती वाढत चालले असून अशा विकृतीचा वेळीच बंदोबस्त झाला पाहिजे. समाजात वाईट कृत्य, वाईट गोष्टी घडू नये यासाठी आता सर्वांनीच पुढाकार घ्यायला पाहिजे. राज्यात महिलांवरील अत्याचार थांबावेत यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. पोलीस प्रशासन त्याचे काम योग्यरीत्या करीत आहेत. यशश्री शिंदे प्रकरणातील आरोपीवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल यासाठी मी जातीने लक्ष घालेन.

उपस्थित उरण तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी व यशश्री शिंदेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर व प्रशासनाकडे केली आहे.

# दोन महिन्यांत रस्त्याची चाळण

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड विभागातील दुरवस्था झालेल्या रस्त्याची डांबरीकारणाने दुरुस्ती केली होती, मात्र अवघ्या दोन महिन्यांत रस्त्यात खड्डे पडले असून, रस्त्यांची चाळण झाली आहे. त्यामुळे कंत्राटदाराने काय काम केले, असा प्रश्न नागरीक विचारत आहेत.

निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अवघ्या दोन महिन्यांत रस्त्यावरील डांबर निघाले असून, रस्त्यावर पुन्हा खड्डे पडल्याचा आरोप माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी केला आहे. यामुळे संबंधितांवर कारवाईची मागणी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. मान्सून पूर्व कामे करताना महापालिकेने सीवूड विभागातील सेक्टर ४६ ए, सेक्टर ५० मधीलडागडुजी केली होती, मात्र दोन महिन्यातच रस्त्यावर पुन्हा खड्डे पडल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

# चिरनेर येथे यशश्री शिंदेच्या हत्येचा निषेध

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील यशश्री शिंदे या तरुणीची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेचा उरण तालुक्यासह, पनवेल, नवी मुंबई परिसरातून मोठ्या प्रमाणात निषेध करण्यात आला असून कोप्रोली नाक्यावरील बाजारपेठ बंद ठेऊन दहागावच्या नागरिकांनी कोप्रोली नाक्यावर मोर्चा काढला होता. त्याचे पडसाद जंगल सत्याग्रहींच्या चिरनेर भूमीसह ग्रामीण परिसरात सर्वत्र उमटले आहेत.

चिरनेर ग्रामपंचायतीने स्पीकरद्वारे चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व बाजारपेठ मंगळवारी बंद ठेवण्याच्या ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याचे काटेखोरपणे पालन करीत चिरनेर गावातील व हायवे वरील बाजारपेठ बंद ठेवण्यात येऊन संपूर्ण चिरनेर परिसरात यशश्री शिंदे हिच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करीत तिची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधम दाऊद शेख या आरोपीस फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली असून, परिसरात या घटनेबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे. चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये लवकरच उभारण्यात येणार हॉस्पिटल

**पनवेल : वार्ताहर**

अतिशय झपाट्याने विस्तारत चाललेल्या या तळोजा औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कामगारांसाठी सद्यस्थितीत एकही हक्काचे हॉस्पिटल नाही, अशी खंत तळोजा एमआयडीसी सीईटीपीचे अध्यक्ष अभिजीत शिंदे व उपाध्यक्ष संदीप डोंगरे यांनी पनवेल उपमहागरप्रमुख महेश सावंत व पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे यांच्याकडे बोलून दाखवली व तळोजा एमआयडीसीमध्ये आपल्या सरकारमधून हॉस्पिटल करिता एखादा भूखंड आरक्षित करून द्यावा, अशी विनंती केली.

मागणीची दखल घेत महेश सावंत व प्रसाद सोनावणे यांनी त्वरित महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन तळोजा एमआयडीसी येथे हॉस्पिटलसाठी भूखंड आरक्षित करून द्यावा, अशी मागणी केली. त्यानुसार उद्योग मंत्री यांनीदेखील लगेचच एमआयडीसीचे सीईओ यांना फोन करून सदर बाबीची पडताळणी करून लवकरात लवकर भूखंड आरक्षित करून द्यावा असे आदेश दिले.

यासंदर्भात जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगर प्रमुख प्रथमेश सोमण व तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# दिव्यांग मुलांच्या सक्षमीकरणासाठी मोबाईल थेरपी बसेस



**खारघर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था आणि हंस फाउंडेशन यांच्या सहकार्याने दिव्यांग मुलांना सक्षम करण्यासाठी नवीन मोबाइल थेरपी बसेसचे भव्य उदघाटनाचा स्मरणार्थ कार्यक्रम सोमवारी (दि. २९) झाले. या वेळी मोबाईल थेरपी बसेस आज उदघाटन करण्यात आले.

प्रत्येक मोबाईल थेरपी बस जवळपास १४००० दिव्यांग व्यक्तींना सखोल आणि जीवनात आत्मनिर्भर करण्यासाठी सेवा प्रदान करेल असे अपेक्षित आहे. आजपर्यंत एकूण ५,२२२ दिव्यांग मुलांची नोंदणी आणि तपासणी करण्यात आली आहे, हे सर्व दिव्यांग व्यक्ती आहेत ज्यांना सर्वसमावेशक आरोग्य सेवा आणि समुपदेशन सेवा प्रदान करण्यात आल्या आहेत. प्रधानमंत्री दिव्याशा केंद्रद्वारे प्रदान केलेले शेक्षणिक साहित्य आणि इतर साधने आणि उपकरणे समाजात सुलभ वितरणासाठी बसमध्ये संग्रहित केली जाऊ शकतात.

नवी मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील वंचित समुदायांच्या धारावी, अँटॉपहिल, क्रांतीनगर, भारतीय नगर, रफी नगर, मंडाळा, पीएमजीपी, बुधाजी नगर, कोपरखैरणे, घणसोली, तळोजा, फलस्पे फाटा, जिते, पेण विविध १५ स्थानांवर महिन्यातून दोनदा दिव्यांग व्यक्तींना सेवा देण्यासाठी संपूर्ण बहुविषयक संघासह मोबाईल थेरपी बस फिरून उपचार व सेवा प्रदान करणार आहे.

# उत्तम तरकसे यांना पुरस्कार

**नवी मुंबई :** पुणे महानगरपालिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात राजयुवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व राजयुवा प्रकाशन पुणे यांच्या वतीने शब्द पंढरीचे आम्ही वारकरी राज्यस्तरीय कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात नवी मुंबईतील पोलीस अधिकारी, कवी सामाजिक कार्यकर्ते उत्तम तरकसे यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे ललिता सबनीस व रवींद्र बाराटे यांच्या हस्ते आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२४ने सन्मानित करण्यात आले.

# पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**पनवेल :** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील प्राजक्ता हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिराचे आयोजन सुप्रीम अंजल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष गणेश ढेकणे, ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय चे बी. के. शिल्पा दीदी बी. के. बिंदू दीदी, भिवंडी ब्लड बँक आणि प्राजक्ता हॉस्पिटल चे कर्मचारी यांच्या वतीने आयोजन केलेले होते. या वेळी मोठ्या प्रमाणात रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# विनापरमिट व्यवसाय करणाऱ्या रिक्षांवर कारवाई करण्याची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

विना परमिट, विना परवाना, विना मीटर नवी मुंबई कार्यक्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या रिक्षांवर कारवाईची मागणी महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष कामगार नेते रवींद्र सावंत यांनी नवी मुंबईतील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे केली आहे.

नवी मुंबई शहरामध्ये अनेक रिक्षांकडे परमिट, वाहन परवाना नसतानाही रिक्षा चालवत आहेत. या प्रकारामुळे ज्या रिक्षांकडे परमिट आणि परवाना आहे, अशा प्रामाणिक रिक्षाचालकांवर अन्याय होत आहे. रिक्षा घेण्यासाठी घेतलेल्या कर्जाचा हफ्ता, घर चालविणे यावरही फरक पडू लागला आहे.

या रिक्षांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जिविताला धोका असून या रिक्षांची रस्त्यावर धावण्याची पात्रता, क्षमता तपासावी त्या दृष्टीने परवाना व रिक्षांचे परमिट तपासण्याची व्यापक मोहिम उघडणे आवश्यक असल्याची भूमिका कामगार नेते रवींद्र सावंत यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनातून मांडली आहे.

या वेळी अध्यक्ष रवींद्र सावंत, सचिव मंगेश गायकवाड, विवेक पवार, महेश भोसले, लक्ष्मण साळुंखे, प्रमुख सल्लागार, वामन रंगारी, प्रदीप मोहिते, संजय सुतार, साहेबराव जाधव, राजू कदम, राजेंद्र जाधव, सुरेंद्र पगारे, सुशांत लम्बे, गणेश शिंदे, विनोद मालुसरे व इतर उपस्थित होते.

# धोकादायक इमारतींना मिळणार स्ट्रक्चरल ऑडिट नोटीस

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने जाहीर केलेल्या धोकादायक इमारतींच्या यादी व्यतिरिक्त ज्या इमारती प्रथमदर्शनी धोकादायक दिसून येत आहेत अशा इमारतींना नोटीसा देऊन स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे सूचित करावे तसेच अनधिकृत बांधकाम विरोधात धडक मोहीम हाती घ्यावी असे निर्देश देत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीवेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला नवी मुंबईतून अधिक प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने व्यापक जनजागृती सुरूच ठेवावी, असे निर्देश देतानाच आयुक्तांनी आजतागायत प्राप्त ४२ हजार ४६१ अर्जांच्या तपासणी कामाला वेग द्यावा अशा सूचना दिल्या. जिल्हा महिला व बालविकास विभागाशी संपर्कात राहून या कामात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून घ्याव्यात व या आठवडाभरात प्राप्त अर्जांची तपासणी पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश समाजविकास विभाग तसेच आठही विभाग अधिकारी यांना देण्यात आले.

नागरिकांशी निगडीत असलेल्या नवी मुंबई महापालिकेच्या विविध सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची कार्यप्रणाली तत्परतेने अंमलात आणावी असे सूचित करतानाच पहिल्या टप्प्यात सुरु होणाऱ्या ३८ सेवा महापालिकेच्या पोर्टलवरुन ऑगस्टमधेच सुरु व्हाव्यात असे आयुक्तांनी निर्देश दिले. पेमेंट गेटवेची सुविधाही उपलब्ध करून देण्याबाबत गतीमान कार्यवाही करावी व त्याची नागरिकांमध्ये व्यापक प्रसिध्दी करावी असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत असावेत यादृष्टीने त्या ठिकाणची सुधारणा कामे जलद करण्यात यावीत तसेच गटारे अथवा नाले सफाई केल्यानंतर तेथील गाळ त्वरित हलवावा असेही स्पष्ट निर्देश देण्यात आले.

नागरी सुविधा कामांची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने अभियंते व कंत्राटदार यांची संयुक्त प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करावी व त्यामध्ये अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

# नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर शासनभरपाई मिळवून देण्याची ग्वाही

## * आमदार रविशेठ पाटील यांच्याकडून खारेपाटात पाहणी




पेण : प्रतिनिधी

मागील काही दिवसात पडलेल्या मुसळधार पावसामुळे पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील शेतीची मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. पेण,पाली सुधागडमतदार संघाचे आमदार रविशेठ पाटील यांनी आज नुकसानग्रस्त भातशेतीची पाहणी करून लवकरात लवकर शासनाच्या वतीने भरपाई मिळवून देण्यात येईल असे आश्वासन उपस्थित शेतकऱ्यांना दिले. यावेळी त्यांच्यासोबत प्रांताधिकारी प्रविण पवार, तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर खारलँड विभागाचे अधिकारी व कृषी अधिकारी उपस्थित होते.

या वेळी त्यांनी खारेपाट विभागातील काळेश्री, वाशी, दिव, वढाव, सरेभागया भागात जाऊन येथील नुकसान झालेल्या पिकाची पाहणी केली या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी लवकरात लवकर नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे या वेळी सांगितले. खारेपाट विभागातील गोरगरीब शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

या वेळी भाजप तालुका अधक्ष श्रीकांत पाटील, वढाव सरपंच पुजा पाटील, काळेश्री सरपंच, दिव सरपंच यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# संभे गावातील तरुणांचा भाजपमध्ये प्रवेश

**रोहे : प्रतिनिधी**



भाजप जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीमध्ये व रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्ष महेश ठाकूर यांच्या नेतृत्वामध्ये संभे गावातील तरुणांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

पेण विधानसभा संयोजक जिल्हा परिषद माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांनीसुद्धा पक्षप्रवेश करणाऱ्या युवकांना शुभेच्छा दिल्या. रायगड लोकसभा संयोजक सतीश धारप, पेणचे आमदार रवीशेठ पाटील, जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेवाडी जिल्हा परिषद गणांत भारतीय जनता पार्टीचे संघटनात्मक जोरदार काम चालू आहे रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्ष महेश ठाकुर दिवसरात्र मेहनत घेऊन पक्षाचे करीत आहेत याचाच प्रभाव पडताना आज दिसत आहेत येणाऱ्या दिवसात अजुन पक्षप्रवेश होणार आहेत असे महेश ठाकुर यांनी सांगितले.

भाजप जिल्हाध्यक्ष मा. आ. धैर्यशील पाटील यांनी संभे गावातील तरुणांना एक आत्मविश्वास देताना म्हणाले की संभे गावाचे आणी माझं एक नातं आहे तुम्हाला भारतीय जनता पक्षामध्ये योग्य मानसन्मान दिला जाईल तुमच्या सर्वांच्या पाठीमागे मी खंबीर उभा आहे, असा विश्वास दिला.

या पक्षप्रवेशाचे पडसाद आंबेवाडी जिल्हा परिषद मतदार संघात नक्कीच उमटतील व येणाऱ्या कालावधीत भाजपा युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर यांच्या माध्यमातून युवकांचा असाच ओघ भाजपमध्ये राहील असे ज्येष्ठ नेते विष्णू मोरे यांनी सांगितले. या वेळी तळवळी माजी सरपंच रघुनाथ कोस्तेकर, खांब विभागाचे भाजपा नेते कल्पेश माने उपस्थित होते.



**खोपोली : नगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा चिंचवली शेकीन येथील शिवसेनेचे युवा नेते अमोल जाधव यांच्या आकस्मित निधनानंतर त्यांच्या वाढदिवसानिमित्त चिंचवली शकील व परिसरातील युवकांनी मंगळवारी डीपी रोड, चिंचवली, गणेश नगर, शेडवली आदी भागातील रस्त्यांवरील खड्डे बुजवून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.**

# रामराज येथील पुरामध्ये वृद्धाचा बुडून मुत्यू



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमध्ये रामराज येथील कुंडलिका नदीला पूर आला होता. त्या वेळी बोरघर येथील ७५ वर्षीय कमळाकर धर्मा म्हात्रे यांचा पुराच्या पाण्यात बुडून मुत्यू झाला.

अलिबाग तालुक्यातील बोरघर येथील ७५ वर्षीय कमळाकर धर्मा म्हात्रे हे कुंडलिका नदीकिनारी असलेल्या शेतीकडे, शेतीच्या कामासाठी गेले होते, परंतु दिवसभरात ते परत आले नाहीत म्हणून त्यांचा मुलगा मिंलिद कमळाकर याने २३ जुलै रोजी रेवदंडा पोलीस ठाणे येथे बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविली होती. २४ जुलै रोजी सायकांळी ५ वा. त्यांचा मृतदेह कुंडलिका नदीपात्रात सापडला. कमळाकर म्हात्रे यांचे शेत नदीकिनारी असल्याने तेथे नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढून बुडून मुत्यू झाला. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोहवा सुजित सुरेश कुंभार हे अधिक तपास करीत आहेत.

# ठाकरे गटाचे उपविभाग प्रमुख महादेव कदम भाजपमध्ये

**माणगाव : प्रतिनिधी**



ठाकरे गटाचे उपविभाग प्रमुख व गेले अनेक वर्षे एकनिष्ठ म्हणून ओळखले जाणारे महादेव कदम यांनी माणगाव येथे रविवारी (दि.२८) श्रीवर्धन विधानसभा प्रमुख प्रशांत शिंदे व युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला.

महादेव कदम यांनी सांगितले की, शिवसेना पक्ष हा ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा पक्ष म्हणून स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी जन्माला घालून नावारूपाला आणला होता. स्व. बाळासाहेबांच्या विचारांवर प्रेरित होऊन अनेक वर्षे कोणत्याही स्वार्थाशिवाय आम्ही भगव्याची इमानइतबारे सेवा केली, परंतु आताच्या नेतृत्वाने काँग्रेस व शरद पवारांची साथ धरल्याने शिवसेनेच्या विचारांचा मूळ गाभाच हरपला आहे. हिंदुजन व मराठी माणसाच्या हितासाठी प्रसंगी स्वतःचे रक्त सांडणाऱ्या शिवसैनिकांना आज मेहबुबा मुफ्ती आणि सोनिया गांधी यांच्या कार्यकर्त्यांसमवेत काम करावे लागत आहे हिच खरी शोकांतिका आहे व त्यामुळेच देशाचे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारून भाजपच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने हिंदुत्वाचा जागर होत असल्याने मी पक्षप्रवेश करीत असल्याचे सांगितले.

या वेळी तालुकाध्यक्ष उमेश साटम, म्हसळा तालुकाध्यक्ष तुकाराम पाटील, तालुका सरचिटणीस गोविंद कासार, लोकसभा विस्तारक रमेश ढेबे, युवा मोर्चा शहराध्यक्ष राजू तेटगुरे, उपाध्यक्ष केतन अडीत, सरचिटणीस अमोल पवार आदी उपस्थित होते.

# 'यशश्रीच्या मारेकऱ्याला फाशी द्यावी'



**कर्जत** : चेतना सामाजिक संस्थेच्या वतीने कर्जत-दहिवली येथील राहणाऱ्या महिलांनी कर्जत पोलीस ठाण्यात निवेदन देऊन उरणमधील यशश्री शिंदे हिचा खून करणाऱ्या नराधमाला लवकरात लवकर फाशी देण्यात यावी, अशी मागणी केली.

महिलांसाठी वातावरण खूपच भीतीदायक झाले आहे. अशा घटना इतक्या सहजपणे घडत आहेत की, कायद्याची कसलीच भीती मारेकऱ्यांना राहिली नाही. याचा गंभीर परिणाम महिलांच्या आयुष्यावर होत आहे. त्यामुळे अशा नराधमांना कठोर शिक्षा करण्याची मागणी करण्यात आली.

# अलिबाग सागवाडी बेलोशीतील भगिनींना घरघंटीचे वाटप

**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली राजिप माजी सदस्य मानसी दळवी यांच्या हस्ते तालुक्यातील सागवाडी बेलोशी येथील ठाकूर समाजातील पल्लवी कैलास पिंगळा यांना धान्य दळण दळण्यासाठी घरघंटी बुधवारी (दि.३१) देण्यात आली.

सागवाडी ही अलिबाग तालुक्यात दुर्गम भागात असून तेथील महिला भगिनींना तीन ते चार किमीपर्यंत पायपीट करून धान्य दळण दळण्यासाठी जावे लागते. याची माहिती मानसी दळवी यांना समजताच त्यांनी सागवाडीतील भगिनींना धान्य दळणची घरघंटी स्वतः पुढाकार घेऊन स्वखर्चाने सागवाडीतील भगिनींना घरघंटी दिली.

भाजप अलिबाग तालुका उपाध्यक्ष नितीन गुंड, ओबीसी सेल दक्षिण रायगडा जिल्हा सरचिटणीस अशोक वरगे, प्रकाश पिंगळा, किशोर पिंगळा, कैलास पिंगळा, गुलाब पिंगळा, निशा पिंगळा, रंजना मेगाळ, वनिता सोनार, जगदीश भोपी, रुपेश काटले, प्रसाद जाधव या वेळी उपस्थित होते.



# भाजपच्या भजन स्पर्धेला प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टी, सांस्कृतिक सेल च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भजनामृत - भजन स्पर्धेला बुधवारी (दि.३१) प्रारंभ झाला. भजन मंडळांचा या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

क्षात्रेक्य समाज हॉल, कुरुळ, अलिबाग येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. बुधवारी या भजन स्पर्धेचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. भाजप दक्षिण रायगड जिल्हा संघटक सतीश धारप, भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, भाजप सहकार आघाडी कोकण विभाग सह संयोजक गिरीश तुळपुळे, हर्षल पाटील, एड. प्रसाद पाटील, दीपक रानोडे, सतीश लेले, उदय काठे, परशुराम म्हात्रे, भजन स्पर्धेचे परीक्षक निवृत्तीबुवा चौधरी व बाळासाहेब वाईकर बुवा ज्ञानेश्वर खैरे बुवा, सामाजिक कार्यकर्ते कबन नाईक सोपान जांभेकर केदार बुवा आठवडे विश्वासराव जोशी संकेत जोशी दीपक रणवडे सुनील दामले जगदीश पाटील आदी या वेळी उपस्थित होते. भजन स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी आपली संस्कृती सांस्कृतिक प्रकोष्ट पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.

भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, भाजपा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी स्पर्धेला भेट दिली. ही स्पर्धा २ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या दिवशी स्पर्धेचे बक्षिस वितरण होईल. समारोपाच्या दिवशी पं. रघुनंदन पणशीकर यांचा अभंगवाणी गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# कर्जत ज्येष्ठ नागरिक संघातर्फे मैत्रीदिन उत्साहात साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

आंतराष्ट्रीय मैत्री दिनी अनेक संस्था विविध उपक्रम राबवतात. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे मैत्री दिन साजरा करण्यात आला. त्यात वयोवृद्ध नागरिकांसाठी सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय मैत्री दिनाचे निमित्ताने कर्जत शहरात जेष्ठ नागरिक संघाने सहल आयोजित केली होती. त्यात कर्जतपासून चाळीस किलोमीटर अंतरावरील आंबिवली येथील 'वनविहार' लेणी येथे भेट देण्यात आला. या निसर्गरम्य ठिकाणी सहलीमध्ये ५७ ते ८३ वर्षे वयाचे जेष्ठ नागरिक सहभागी झाले. शंभर एकर घनदाट जंगल असलेल्या परीसरात ज्येष्ठ नागरिकांनी वृक्षारोपण करून निसर्गाशी मैत्री साधली.

या परिसरात असलेल्या लेण्यांना सर्वांनी भेट दिली. सहलीचा आनंद लुटताना कोणीही पावसाची पर्वा केली नाही. सुग्रास भोजनानंतर सर्व सभासदांनी कथा कथन,कविता वाचन,नकला इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम केले. रायगड भूषण ह.भ.प.योगिता गणेश थरपुडे यांच्या प्रवचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या वेळी संस्थेचे अध्यक्षसुभाषचंद्र नातु, सचिव कृष्णा लाड, कोषाध्यक्ष पद्माकर गांगल, रश्मी गांगल, कार्यकारिणी सदस्य अशोक मांजरेकर, प्राजक्ता गरवारे, संगीता मुरकुटे, सुरेश कुडतरकर, शिवाजी श्रीखंडे, व्यंकटेश हलगत्ती, बळीराम दिघे, विजय कुलकर्णी, सुहास प्रधान, व्यंकटेश हलगत्ती, विरेश्र्वर जोशी, दिलीप गडकरी, विद्याधर गुजराथी, प्रमोद जोशी, प्रभाकर करंजकर, विनायक उपाध्ये, मुकुंद टुमने, मधुरा घायाळ, कोजागिरी काटदरे, शकुंतला पाटील आदी उपस्थित होते.



# अलिबाग शहराच्या कचरा कोंडीप्रकरणी कार्यवाहीची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहराच्या कचरा कोंडी प्रकरणी माजी नगरसेवक अमर वार्डे यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना दुसरे स्मरणपत्र दिले आहे. कचरा प्रश्री अलिबाग नगर परिषदेला तातडीने निर्णय घेण्याबाबतचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

अलिबाग शहरातील कचरा उचलण्याचा नगर परिषदेने दिला ठेका करार मुदत संपल्याने संपुष्टात आला आहे. नवीन ठेक्यासाठी निविदा काढूनही त्यास प्रतिसाद मिळालेला नाही.

त्यामुळे अलिबाग शहराची कचरा कोंडी होण्यास सुरूवात झाली आहे.

शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे डेपो तयार होत असून त्यामुळे आरोग्य विषयक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगरपरिषदेला तातडीने कचरा व्यवस्थापना बाबत ठोस पाऊले उचलण्यासंदर्भात निर्देश द्यावेत, अशी मागणी वार्डे यांनी केली आहे.

# ऑलिम्पिकमध्ये भारताच्या खेळाडूंची कमाल

## स्वप्निल कुसळे रायफल स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र

**पॅरिस : वृतत्तसंस्था**

बुधवारचा दिवस भारतासाठी खूप खास राहिला. पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेन, श्रीजा अकुला, स्वप्नील कुसाळे आणि लवलीना बोरगोहेन यांनी विजय संपादन केला. महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या स्वप्नीलने अंतिम फेरी गाठली आहे. तो ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे.

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने आतापर्यंत दोन कांस्यपदके पटकावली आहेत. सर्वप्रथम मनू भाकेर हीने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात भारताला कांस्यपदक मिळवून दिले. त्यापाठोपाठ मनू भाकेर व सरबजोत सिंह या नेमबाजांच्या जोडीने भारताला १० मीटर एअर पिस्तुलच्या मिश्र दुहेरी प्रकारात कांस्यपदक जिंकवून दिले. आता महाराष्ट्रातील स्वप्निल कुसळे हा खेळाडू ५० मीटर रायफल स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे.


कोल्हापूरचा स्वप्निल कुसळे हा ५० मीटर रायफल स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. ऑलिम्पिकमधील थ्री पोजिशनिंग ५० मीटर रायफल स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत तो ५९० गुणांसह सातवा आला आहे. आता स्वप्निलला स्पर्धेच्या अंमित फेरीत त्याचे नेमबाजी कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली असून या फेरीत त्याने त्याची सर्वोत्तम कामगिरी दाखवली तर भारताच्या खात्यात तिसरं पदक जमा होऊ शकते. संपूर्ण देशाला स्वप्निलकडून अपेक्षा आहेत.

### आज अंतिम फेरी



स्वप्नील गुरुवारी (दि.१) अंतिम फेरीत खेळणार आहे. दुपारी १ वाजता अंतिम फेरीला सुरुवात होईल. या स्पर्धेत नेमबाजाला तीन पोजिशन्समध्ये नेम साधावा लागतो. यामध्ये नीलिंग म्हणजेच गुडघ्यावर बसून नेम साधणे, पोटावर झोपून निशाणा साधणे आणि उभा राहून निशाणा साधायचा असतो. याच स्पर्धेत भारताचा आणखी एक खेळाडू प्राथमिक फेरीत उतरला होता, परंतु अवघ्या एका गुणाने त्याने अंतिम फेरीची संधी गमावली आहे. ऐश्वर्य प्रतापसिंह तोमर असे त्याचे नाव असून तो ५८९ गुणांसह ११व्या स्थानावर राहिला.

### श्रीजाने केली कमाल



पहिल्यांदाच ऑलिम्पिकसारख्या मोठ्या स्पर्धेत खेळत असलेल्या भारताच्या श्रीजा अकुलाने तमाम देशवासियांना खुशखबर देताना राऊंड-१६ मध्ये प्रवेश केला. टेबल टेनिसमध्ये २६ वर्षीय खेळाडूने चमकदार कामगिरी केली. तिने राऊंड-३२मध्ये ४-२ असा विजय साकारला. श्रीजाने या विजयासह इतिहास रचला. ऑलिम्पिकच्या इतिहासात प्री क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश करणारी ती दुसरी भारतीय महिला शिलेदार ठरली आहे.

### तिरंदाज दीपिका कुमारी प्री-क्वार्टर फायनलमध्ये



पॅरिस ऑलिम्पिकच्या पाचव्या दिवशी भारताची स्टार महिला तिरंदाज दीपिका कुमारीने एकेरीत रीना परनाटचा ६-५ असा पराभव केला. त्यानंतर दीपिका कुमारीने महिलांच्या वैयक्तिक तिरंदाजीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दीपिकाने नेदरलँडच्या क्विंटी रोफेनचा ६-२ असा पराभव केला.

### पि. व्ही. सिंधूची पदकाच्या दिशेने वाटचाल



भारताची बॅडमिंटनपटू ऑलिम्पिकमध्ये पदाकांची हॅटट्रिक मारण्याच्या इराद्याने मैदानात आहे. महिला एकेरीत बुधवारी (दि.३१) पी. व्ही. सिंधूचा सामना इस्टोनियाच्या क्रिस्टीना कुबासोबत झाला. पहिल्या सामन्याप्रमाणे सिंधूने पहिल्या गेममध्ये आघाडी घेतली. याआधी सिंधूने आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली होती. सिंधूने पहिल्या गेममध्येच आपली चमक दाखवली. तिने १४ मिनिटांत पहिला गेम आपल्या नावावर केला. २१-५ अशा फरकाने सिंधू कुबाला वरचढ ठरली.

संपूर्ण सामन्यात सिंधू प्रतिस्पर्धी खेळाडूला वरचढ ठरली. तिने दुसरा गेम २१-१० असा जिंकून पुढच्या फेरीत प्रवेश केला. सिंधूने यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये सलग दुसरा विजय नोंदवला. बुधवारच्या विजयामुळे पीव्ही सिंधूने उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. पीव्ही सिंधू ऑलिम्पिकमध्ये पदकाची हॅटट्रिक मारणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भारताचा सुपर ओव्हरमध्ये रोमहर्षक विजय

**श्रीलंका : वृत्तसंस्था**



भारताने दिलेल्या १३८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करून यजमान श्रीलंका सहज सामना जिंकेल असे अपेक्षित होते, मात्र श्रीलंकेच्या डावातील अखेरच्या काही षटकांमध्ये नाट्यमय घडामोडी घडल्या. रिंकू सिंग आणि सूर्यकुमार यादव यांनी दोन षटकांत चार बळी घेत सामना फिरवला.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील हा सामना म्हणजे एखाद्या चित्रपटातील हास्यास्पद कथाच म्हणावी लागेल. अखेरच्या २ षटकांत अवघ्या ९ धावांची गरज असताना सामना सुपर ओव्हरपर्यंत पोहोचला. १९व्या षटकात रिंकू सिंगने ३ धावा देत २ बळी घेतले तर सूर्याने शेवटच्या षटकात केवळ ५ धावा देऊन २ बळी घेण्याची किमया साधली. यामुळे यजमानांना लक्ष्य गाठता आले नाही. श्रीलंकेचा संघ निर्धारित २० षटकांत ८ बाद १३७ धावा करू शकल्याने सामना अनिर्णित संपला. मग सुपर ओव्हरमध्ये भारताने विजय मिळवून ३-० ने मालिका जिंकली. पल्लेकले येथील आंतरराष्ट्रीय मैदानात अखेरचा सामना झाला.

सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेने दोन गडी गमावून अवघ्या २ धावा केल्या. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने सुपर ओव्हर टाकली. तीन चेंडूत २ धावा देऊन त्याने २ बळी घेतले. मग ३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताकडून सूर्यकुमार यादवने पहिल्याच चेंडूवर चौकार ठोकून आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

श्रीलंकेकडून कुसल परेराने सर्वाधिक (४६) धावा करून आपल्या संघाला मजबूत स्थितीत पोहोचवले, पण सूर्या आणि रिंकू या जोडीने सर्वकाही बदलून टाकले. श्रीलंका सहज सामना जिंकेल असे वाटत असताना भारतीय गोलंदाजांनी सामन्यात रंगत आणली. १९व्या षटकात रिंकू सिंगने अवघ्या तीन धावा देऊन दोन बळी घेतले. भारताकडून रिंकू सिंग, रवी बिश्नोई आणि वॉशिंग्टन सुंदर या त्रिकुटाने प्रत्येकी २-२ बळी घेतले. यात भर पडली अन् अखेरच्या षटकात सूर्याने दोन बळी घेतले.



























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com